सुविचार
"आयुष्य कधीच परिपूर्ण नसते, पण प्रत्येक दिवस सुंदर बनवण्याची संधी आपल्या हातात असते."

पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला
● वर्ष १६ ● अंक ४० ● रविवार, दि. १६ ऑगस्ट २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८
RNI No.- MAHMAR/2012/49642 Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 Web. https://epaper.citynewssuperfast.com

सिटी न्यूज सुपरफास्ट
पातुर शहरात
अंक मिळण्यासाठी व जाहिरातींसाठी
संपर्क
प्रदीप काळपांडे
तालुका प्रतिनिधी
+91 9423259577

## » थोडक्यात

### सोनिया गांधींनी खर्गेसाठी मागितली खुर्ची!

नवी दिल्ली : राजधानी दिल्लीत काँग्रेसच्या स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमावरुन शनिवारी वाद निर्माण झाला; ' वंदे मातरम् ' गीत पूर्ण वाजवण्यास ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांनी आक्षेप घेतल्याचा आरोप भाजपने केला. मात्र, काँग्रेसने स्पष्ट केले की, सोनिया गांधी केवळ पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासाठी खुर्चीची मागणी करत होत्या. यावरुन भाजप उपाध्यक्ष केशव उपाध्ये यांनी 'गांधी घराण्याला 'वंदे मातरम'ची ॲलर्जी का?' असा सवाल विचारला आहे. भारताच्या सांस्कृतिक चेतनेचे, सभ्यतागत वारशाचे आणि राष्ट्रभावनेचे प्रतीक असलेल्या 'वंदे मातरम'च्या संपूर्ण गायनावेळी काँग्रेसच्या सर्वोच्च नेतृत्वाच्या हावभावांनी अनेक प्रश्न निर्माण केले आहेत, असे उपाध्ये म्हणाले.

### महत्त्वाच्या तीन रेल्वे गाड्या बंद!

मुंबई : मध्य रेल्वेने मार्ग, वेळापत्रक आणि परिचालनाचा ताळमेळ साधत दादर-गोरखपूर आणि दादर-बलिया या विशेष गाड्यांना नियमित करण्याचा निर्णय घेतला. मात्र, दादर-रत्नागिरी, मुंबई-भुसावळ आणि सह्याद्री एक्स्प्रेस अशा महाराष्ट्रातील गाड्या पुन्हा सुरू करताना मात्र अडचणींचे कारण पुढे केले जात आहे.

### मुंबईत एकाच घरात सापडले ४ मृतदेह!

मुंबई : संपूर्ण देशात शनिवारी भारताचा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा केला जात असताना दक्षिण मुंबईच्या कुलाबा परिसरात असणाऱ्या नेव्ही नगरमध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. नेव्ही नगरमधील कॉलनीत वास्तव्याला असणाऱ्या एका कर्मचाऱ्याने आपल्या पत्नी आणि दोन मुलांसह आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. नौदल कर्मचाऱ्याने गळफास लावून आत्महत्या केली.

CLASSIFIED

शेती विकणे आहे

मौजा चांदूर, ता.जि अकोला येथील शेत सर्व्हे नं. 188/2 आईच्या शाळेसमोर व प्रभात किड्सच्या मागील बाजूस, नगर पालिकेच्या बॉर्डरला लागून उत्तम लोकेशनचे आहे. लेआउटचे शेत 84 आर. लेआउटचे शेत विकणे आहे.

संपर्क : शरदचंद्र नेवास्कर
मो. नं.- 9822702276

# सरकारने मराठा उद्ध्वस्त करण्याचा डाव आखलाय!

## मनोज जरांगे पाटील यांचा २९ ऑगस्टसाठी एल्गार

प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**छत्रपती संभाजीनगर :** सरकारने मराठा समाजाचा अवमान करायचे ठरवले आहे. चंद्रशेखर बावनकुळे आणि संजय शिरसाट यांनी मराठा समाज उद्ध्वस्त करण्याचा विडा उचलला आहे; त्यांना २८ तारखेपर्यंतची मुदत दिली आहे. शिंदे-फडणवीस यांनी काढलेल्या जीआरची अद्याप अंमलबजावणी झालेली नाही. आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याचे आश्वासन पाळले नाही. आमच्याशी खुन्नस धरली, तर आम्हीही राजकारणातून संपवून दाखवू. परिस्थिती उद्भवल्यास आंदोलनाची दिशा बदलून पुन्हा मुंबईत धडक मारू, असा इशारा मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. ज्यांना राजकीय पक्षांची बाजू घ्यायची असेल, त्यांनी अंतरवली सराटीमध्ये येऊ नये. इकडे येऊन तिकडच्या नेत्यांना खूश करण्यासाठी चाली खेळणार असाल, तर मराठा समाज सोडणार नाही. तब्येत ठीक नसल्यामुळे रुग्णालयात उपचार घेत असताना मराठा अभ्यासकांच्या नियोजित बैठकीसाठी त्यांनी तात्पुरता डिस्चार्ज घेतला असून, पत्रकार परिषदेत सरकार, सत्ताधारी नेते, विरोधक आणि काही दुटप्पी अभ्यासकांवर जोरदार निशाणा साधला. इथे येऊन विसंवाद निर्माण करणाऱ्यांना किंवा दोन्ही दगडांवर हात ठेवणाऱ्यांना खपवून घेतले जाणार नाही. अभ्यासकांनी नीट वागायचे असेल तरच यावे, विष कालवण्यासाठी येऊ नये. मुंबई आंदोलनावेळी जीआर खूप छान आहे म्हणणारे अभ्यासक नंतर दुरुस्त्या काढत फिरतात.



### वडेट्टीवार आणि २०२९ चे संकेत

ओबीसी समाज नाही, तर केवळ काही नेते आंदोलन करत आहेत. विनाकारण समाजासमाजांमध्ये भांडणे लावू नका; मराठा समाज तुमची ताकद हाणून पाडेल. वडेट्टीवारांनी काँग्रेस पक्षाचे वाटोळे करून ठेवले आहे. मी दिल्लीत गेल्यापासून हिंदी शिकायला सुरुवात केली आहे, २०२९ मध्ये पूर्ण हिंदीत बोलणार आहे,' असे सांगत त्यांनी भविष्यातील देशपातळीवरील रणनीतीचे संकेत दिले.

### प्रमाणपत्रे मिळेपर्यंत अंतरवली सोडायची नाही!

५८ लाख कुणबी नोंदी मिळूनही जाणीवपूर्वक प्रमाणपत्रे दिली जात नाहीत. ज्यांनी कुणबी किंवा हैदराबाद गॅझेटनुसार अर्ज केला आहे, त्यांनी अर्जाच्या संपूर्ण तपशिलासह अंतरवली सराटीत यावे; प्रमाणपत्र मिळेपर्यंत अंतरवली सोडायची नाही. ज्या उमेदवारांची निवड झाली आहे पण नियुक्ती रखडली आहे, त्यांनी स्वतः किंवा पालकांनी अर्जासह यावे. नियुक्तीपत्र घेतल्याशिवाय मागे हटू नये. सारथी व अण्णासाहेब पाटील महामंडळात ज्यांचे अर्ज किंवा परतावे रखडले आहेत किंवा योजना बंद झाल्या आहेत, त्यांनी सर्व पुराव्यांसह अंतरवलीत दाखल व्हावे, असे आवाहन जरांगे यांनी मराठा समाजाला केले आहे.

# विकसित भारतासाठी 'सप्तधारा'!

## सात क्षेत्रांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा भर

वृत्तसंस्था १६ ऑगस्ट

**नवी दिल्ली :** देशाला २०४७ पर्यंत 'विकसित भारत' बनवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात 'सप्तधारा' अर्थात सात विकासप्रवाहांची संकल्पना मांडली. उत्पादन, शेती व अन्नप्रक्रिया, तंत्रज्ञान व नवोपक्रम, गतिशक्ती, संरक्षण शक्ती, हरित व निळी अर्थव्यवस्था आणि सॉफ्ट पॉवर या सात क्षेत्रांवर केंद्रित प्रयत्नांतून विकसित भारताचा पाया मजबूत केला जाईल, असे मोदी म्हणाले. त्याचबरोबरच स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या तरुणांच्या कुटुंबांवरील आर्थिक भार कमी करण्यासाठी केंद्र सरकारकडून मोफत ऑनलाइन प्रशिक्षणाची व्यवस्था उभारण्याची महत्त्वाची घोषणा पंतप्रधानांनी केली.

लाल किल्ल्यावरून शनिवारी, ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त देशाला



उद्देशून केलेल्या भाषणावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जेन-झी तरुणांना साद घातली. जेन-झींच्या आशा-आकांक्षा आणि युवा-शक्तीचा देशाच्या विकासातील सहभागावर मोदींनी भाषणात भर दिला. सुधारणा हा केवळ प्रचलित शब्द नाही किंवा कोणी सक्ती केली म्हणून त्या केल्या जात नाहीत, ती दृढ धारणा आहे. आपण 'रिफॉर्म एक्स्प्रेस'वर स्वार झालो आहोत आणि आता सुधारणांच्या पुढील टप्प्याकडे वाटचाल करीत आहोत, असे मोदी म्हणाले. 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेला नवी दिशा देण्यासाठी मोदींनी 'सप्तधारा'चा विचार मांडला. सशस्त्र नक्षलवादाचे देशातून जवळपास उच्चाटन झाले आहे. मात्र नक्षलवादी विचारसरणीचा प्रभाव अजूनही सार्वजनिक जीवनातील विविध क्षेत्रांमध्ये आणि संस्थांमध्ये टिकून आहे. अशा 'दिमागी नक्षली' प्रवृत्ती ओळखून त्यांना एकटे पाडण्याचे आवाहन पंतप्रधानांनी केले.

### 'जेन-झीं'साठी सरकारचे पाऊल पुढे

आगामी एका वर्षात एक कोटी तरुणांना कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) कौशल्यांचे प्रशिक्षण देण्याचे लक्ष्य सरकारने निश्चित केले आहे. तंत्रज्ञान आणि कौशल्याधारित रोजगाराच्या बदलत्या स्वरूपाच्या पार्श्वभूमीवर तरुणांना भविष्यासाठी सज्ज करण्यावर सरकारचा भर असल्याचे मोदी यांनी स्पष्ट केले.

# शिंदे महाराष्ट्राच्या मनातील मुख्यमंत्री!

प्रतिनिधी १६ ऑगस्ट

मुंबई : केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी एकनाथ शिंदे यांच्या कामाचे कौतुक करीत ते लोकांच्या मनातील मुख्यमंत्री असल्याचे म्हटले आहे. तर शिंदे मुख्यमंत्री व्हावेत, ही शिवसैनिकांची इच्छा असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले. शिवसेनेच्या ज्येष्ठ नेत्यांनी शिंदेंच्या मुख्यमंत्रीपदावरून वक्तव्ये सुरु केल्याने राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा सुरु झाली आहे.

शिंदे हे जनतेच्या अडीअडचणी सोडवितात, आपत्कालीन परिस्थितीत धावून जातात. त्यांचे काम जनतेला माहीत आहे, असे जाधव यांनी म्हटले आहे. त्यांच्या वक्तव्याला सरनाईक यांनी पाठिंबा दिला आहे. सध्याच्या परिस्थितीत भाजपचे संख्याबळ अधिक असल्याने मुख्यमंत्रिपद भाजपकडे आहे. भविष्यात शिवसेनेचे अधिक आमदार आणि खासदार निवडून आले, तर मुख्यमंत्रिपदावर शिवसेना दावा करेल, अशी भूमिकाही सरनाईक यांनी मांडली.

# मुंढेंच्या रडारवर सेलिब्रिटी!

## विमल इलायची जाहिरात प्रकरण

प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**मुंबई :** महाराष्ट्राच्या अन्न आणि औषध प्रशासन विभागाने म्हणजेच एफडीएने बॉलिवूड अभिनेता शाहरुख खान, अजय देवगण आणि टायगर श्रॉफ यांना विमल, इलायचीच्या जाहिरात प्रकरणात कारणे दाखवा नोटीस पाठवली आहे. विमल पान मसाल्यावर राज्यात बंदी आहे तरीही ही जाहिरात कशी काय केली, यावर एफडीएने तिन्ही अभिनेत्यांकडे उत्तर मागितलं आहे. महाराष्ट्र अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे हे सध्या त्यांच्या धाडींसाठी आणि धडक कारवाईसाठी चर्चेत आहेत. त्यांच्याच विभागाने जी स्क्रुटिनी केली त्यानंतर या तीन अभिनेत्यांना कारणे दाखवा नोटीस पाठवण्यात आली आहे. महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेल्या विमल पान मसाला, इलायचीचा प्रचार केल्याबद्दल या तिघांना ही नोटीस बजावण्यात आली आहे. २०२४ मध्ये विमल या पान मसाला कंपनीच्या जाहिरातीसाठी हे तीन अभिनेते एकत्र आले होते. या तिघांना 'विमल पान मसाला इलायची'च्या जाहिरातीतील सहभाग तातडीने थांबवण्याचे आणि त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया हँडल, वेबसाइटवरून जाहिरातीशी संबंधित सर्व प्रमोशनल मजकूर काढून टाकण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या कलाकारांवर कायदेशीर कारवाई का करू नये, याचं सविस्तर लेखी स्पष्टीकरण १५ दिवसांच्या आत सादर करा हे बजावत ही नोटीस दिली आहे.

### १५ दिवसांच्या आत उत्तर देण्याचे निर्देश

तंबाखू किंवा निकोटीनयुक्त गुटखा आणि पान मसाल्यावर एफडीएनं कारवाई तीव्र केल्यामुळे शाहरुख, अजय देवगण आणि टायगर हे चौकशीच्या वर्तुळात सापडले आहेत. या तिघांनी मिळून केलेल्या जाहिरातीमुळे विमल पान मसाला ब्रँडशी संबंध निर्माण होतो आणि हे त्याचं अप्रत्यक्ष प्रमोशन ठरू शकतं, असं एफडीएनं त्यांच्या नोटीसमध्ये नमूद केलं आहे. एफडीएने याबाबत कारवाई करत अजय देवगणच्या जुहू इथल्या निवासस्थानी, शाहरुख खानच्या वांद्रे इथल्या मन्नत या निवासस्थानी आणि टायगरला त्याच्या टायगर श्रॉफ प्रॉडक्शन्स एलएलपी या प्रॉडक्शन हाऊसच्या पत्त्यावर कारणे दाखवा नोटीस पाठवण्यात आली आहे. १५ दिवसांच्या आत या प्रकरणी उत्तर द्या असेही एफडीएने म्हटले आहे.




# महाराष्ट्र देशाचे ग्रोथ इंजिन: मुख्यमंत्री

## राज्य दुष्काळमुक्तीचा संकल्प, १३ जिल्ह्यांचे निर्धारित लक्ष्य पूर्ण

प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**मुंबई :** 'विकसित भारताच्या संकल्पनेमध्ये राज्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून महाराष्ट्र हे देशाच्या विकासाचे 'ग्रोथ इंजिन'आहे. शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविण्यासोबतच महाराष्ट्राला कायमस्वरूपी दुष्काळमुक्त करण्याचा राज्य सरकारचा संकल्प आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी मुंबईत केले.



सेनानी, क्रांतिकारक तसेच देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या जवानांना अभिवादन करून मुख्यमंत्र्यांनी राज्यातील जनतेला स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. मंत्रालयात भारताच्या ८०व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त झालेल्या मुख्य शासकीय समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. ध्वजारोहणानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी उपस्थित प्रशासकीय अधिकारी, सेनादलाचे अधिकारी, निमंत्रित नागरिक यांची भेट घेऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, मुंबईच्या महापौर रितू तावडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल आदी उपस्थित होते.

'पंतप्रधान नरेंद्र मोदीयांच्या नेतृत्वाखाली भारताने गेल्या १२ वर्षांत जगातील चौथ्या क्रमांकाची मोठी अर्थव्यवस्था होण्याचा टप्पा गाठला असून २५ कोटी नागरिकांना गरिबीतून बाहेर काढण्यात देशाला यश आले आहे. विकसित भारत म्हणजे केवळ विकसित अर्थव्यवस्था नव्हे, तर दीन-दलित, गोरगरीब, आदिवासी, शेतकरी, शेतमजूर आणि महिलांसह समाजातील प्रत्येक घटकाच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडविणे महत्त्वाचे आहे', असे मुख्यमंत्री म्हणाले.

### महिलांना शेतकऱ्याचा दर्जा देणारे पहिले राज्य

महिला शेतकरी कायदा तयार करून त्यांना शेतकऱ्याचा दर्जा देण्याचा निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे, असे फडणवीस यांनी सांगितले. महिलांसह समाजातील वंचित घटकांच्या विकासासाठी लक्षित योजना राबवून सर्वांना सोबत घेऊन विकास साधण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्र देशाचे 'स्टार्टअप कॅपिटल' बनले असून राज्यात सर्वाधिक गुंतवणूक आणि परकीय गुंतवणूक होत आहे. त्यामुळे युवकांसाठी रोजगाराच्या मोठ्या प्रमाणावर संधी निर्माण होत आहेत, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# कावड यात्रा हिंदुत्व आणि सनातन धर्माची परंपरा - आ. रणधीर सावरकर

प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**अकोला :** श्री हनुमान मंदिर ते पाच मोरी दरम्यानच्या स्ट्रीट लाईट पोलचा लोकार्पण सोहळा हजारो शिवभक्तांच्या उपस्थितीत आणि साक्षीने पार पडला. आमदार रणधीर भाऊ सावरकर म्हणाले, "कावड यात्रा अत्यंत महत्त्वाची आहे. ही यात्रा हिंदुत्व आणि सनातन धर्माची परंपरा टिकवून ठेवणारी व तिचे रक्षण करणारी आहे. या यात्रेच्या माध्यमातून सामाजिक समरसता निर्माण होते आणि मानवतेच्या नात्याने एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होऊन एकतेचे दर्शन घडते.

आमदार सावरकर पुढे म्हणाले, "खासदार अनुप धोत्रे हे सातत्याने विकासकामांना गती देत आहेत. आकोटला जाणाऱ्या रेल्वे पुलाला १०० वर्षे पूर्ण झाली आहेत. त्या नवीन पुलासाठी ९० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. जुना पूल न पाडता नवीन पूल उभारून वाहतूक व्यवस्था सुरळीत राहील, या दृष्टीने रेल्वे प्रशासन आणि सार्वजनिक बांधकाम विभाग नियोजन करत आहेत.



स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल म्हणाले, "खासदार धोत्रे, आमदार सावरकर यांच्यासह मनपा व जिल्हा प्रशासन अकोलावासीयांच्या सेवेसाठी सातत्याने कटिबद्ध आहे. जनतेच्या समस्या हीच आमची समस्या असून त्या सोडवणे ही आमची जबाबदारी आहे. खासदार अनुप भाऊ धोत्रे म्हणाले, "अकोला शहराच्या विकासासाठी केंद्रीय दळणवळण मंत्र्यांच्या माध्यमातून २२ किलोमीटरचा मिनी बायपास मंजूर करण्यात आला आहे. हा बायपास चारही दिशांना जोडून शहराबाहेरून जाणाऱ्या नागरिकांना वाहतुकीची सुलभ सुविधा उपलब्ध करून देईल. या मिनी बायपासचा शहराला मोठा फायदा होणार आहे. तसेच अनेक रस्ते उत्तम दर्जाचे बनवले जातील. खंडवा-अकोला रेल्वेचे कामही वेगाने सुरू आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाजप प्रसिद्धी प्रमुख तथा माजी नगरसेवक गिरीश जोशी यांनी केले. अशोक फाईल भागातील नागरिकांच्या वतीने नगरसेवक शरद तुरकर यांच्या नेतृत्वात खासदार धोत्रे व आमदार सावरकर यांचे स्वागत करण्यात आले. विविध शिव मंडळांच्या वतीने आमदारांचे स्वागत झाले. पप्पू मोरवाल, राजेश भारती, सुनील गरड तसेच वारकरी संप्रदायाच्या वतीनेही स्वागत करण्यात आले. शिवभक्त मंडळाच्या वतीने खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर, विजय अग्रवाल आणि जयंत मसने यांचा सत्कार करण्यात आला.

सोहळ्याला जयंतराव मसने, अमोल गोगे, माधव मानकर, गिरीश जोशी, संजय गोटफोडे, शरद तुरकर, विद्याधर काकड, सौ. आरती घोगलिया, सौ. अनिता चौधरी, विवेक भरणे, संतोष पांडे, प्रशांत जोशी, सागर शेगोकार, प्रकाश घोगलिया, दिलीप नायसे, दिनेश्वर पवार, दिलीप मिश्रा, अमोल मोहोकार, शीतल जैन, रवी दुतोंडे, रमेश करिहार, हर्षद भांबेरे, धनंजय धबाले, सुनील बाठे, जमीर खान, राजेश चौधरी, गोपाल नागपुरे, अतुल अग्रवाल, पंकज राठी, हेमंत शर्मा, अॅड. बलराम बामणेट, रुपेश यादव, उज्ज्वल बामणेट, रवी यादव, उमेश श्रीवास्तव, प्रकाश रेड्डी, घनश्याम शिंदे, बरकत शहा, सुषमाताई शुक्ला, उमाताई शाहू, सचिन आयवाडे, कुलदीप दुबे यांच्या सह शिवभक्त उपस्थित होते.

# आर.डी.जी. पब्लिक स्कूलमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी १६ ऑगस्ट



**अकोला :** आर.डी.जी. पब्लिक स्कूलमध्ये स्वातंत्र्यदिन देशभक्ती आणि उत्साहपूर्ण वातावरणात मोठ्या आनंदाने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी मान्यवरांचे स्वागत करून केली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रगीताच्या सुरेल स्वरांसोबत सर्व उपस्थितांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. या शुभप्रसंगी आर.डी.जी. पब्लिक स्कूलचे संचालक श्री. दिलीपराजजी गोयनका, सुनयनाजी गोयनका, भारतीय सेवा सदनचे सदस्य श्री. सुनीलजी अग्रवाल, प्राचार्य कूरियचन सी. पी., उपप्राचार्या श्वेता चोमवाल तसेच भारतीय सेवा सदनच्या सदस्या व शिक्षिका श्रीमती इंदुबाला चौधरी यांचे विद्यार्थ्यांनी गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. कार्यक्रमात संगीत विभाग आणि विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या देशभक्तीपर गीतांनी संपूर्ण वातावरण राष्ट्रप्रेमाने भारून गेले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या देशभक्तीपर समूह नृत्याने उपस्थितांची मने जिंकली.

श्री. दिलीपराजजी गोयनका यांनी आपल्या प्रेरणादायी विचारांतून विद्यार्थ्यांना एकतेचे महत्त्व समजावून सांगितले आणि सदैव योग्य मार्गावर चालण्याचे आवाहन केले. त्यानंतर प्राचार्य कूरियचन सी. पी. यांनी स्वातंत्र्यदिनानिमित्त प्रेरणादायी विचार व्यक्त करून विद्यार्थ्यांना राष्ट्राच्या प्रगतीत आपले योगदान देण्याची प्रेरणा दिली.

विद्यार्थिनी गार्गी धनभर हिने इंग्रजी भाषेत, तर आरवी मुरुमकर हिने मराठी भाषेत स्वातंत्र्यदिनानिमित्त आपले सुंदर विचार व्यक्त केले. त्यांच्या प्रभावी वक्तृत्वाचे उपस्थितांनी कौतुक केले. रेड हाऊसच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विशेष देशभक्तीपर वाद्य-संगीताने सर्वांचे मन मोहून घेतले. विद्यार्थी प्रियांश वासरानी याने हिंदीतील देशभक्तीपर कवितेचे सुंदर वाचन करून वातावरणात देशप्रेमाची भावना निर्माण केली.

यानंतर उपस्थित मान्यवरांनी ब्लू हाऊस, ग्रीन हाऊस, रेड हाऊस आणि यलो हाऊसच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या आकर्षक बुलेटिन बोर्डची पाहणी केली. या संपूर्ण कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन विद्यार्थीनी नव्या खंडेलवाल आणि निमिष राठी यांनी केले, तर मीनल रूहाटिया हिने आभार प्रदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी रेड हाऊसच्या शिक्षकांनी विशेष सहकार्य केले. संपूर्ण कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, एकता, शिस्त तसेच राष्ट्राप्रती असलेली जबाबदारीची भावना अधिक दृढ झाली. अशा उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात आर.डी.जी. पब्लिक स्कूलमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

# शिवपुर, अकोलखेड, अकोली जहागीर शिवारात चोरीच्या वाढत्या घटना; पोलीस प्रशासनाला भुरट्या चोरांचे आव्हान

प्रतिनिधी १६ऑगस्ट

**अकोट :** अकोट तालुक्यातील शिवपूर कासोद, अकोली जहागीर, आंबोडा, अकोलखेड, दहीखेड फुटकर, अशा सात ते आठ गावांमध्ये भुरट्या चोरांनी धुमाकूळ घातला आहे. पोलिस प्रशासनाला चोरट्यांनी आव्हान दिले आहे.

शेतकऱ्यांच्या बोअरवेलच्या केबल, पाण्याच्या टाक्या, झटका मशीन, शेती उपयुक्त साहित्य, गाईसह वासरू, बैल जोड्यांची चोरी होत आहे. जनावरे थेट कटाईला जात आहेत असे शेतकरी बोलत आहे. हजारो रुपयाचे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. शेतातील सिंचन, स्प्रिंकलर लावणे आदी कामे ठप्प झाली आहेत. शेतकरी हवालदील झाला आहे. शेतकऱ्यांनी किती तरी तक्रारी देऊन सुद्धा न्याय मिळत नाही. शेतकऱ्यांना तात्काळ भरपाई द्यावी व भुरट्या चोरांचा बंदोबस्त करावा अन्यथा आम्हाला वरिष्ठांकडे धाव घ्यावी लागेल असा इशारा दिला आहे.



आकोली जहागीर, दहीखेड फुटकर, अकोलखेड, शिवपुर कासोद येथील रेखा जायले, मनोज रंधे, प्रवीण गयधर, सुनील पाडखे, अक्षय जायले, राहुल जायले, मयूर लहाने, दिगंबर जायले. दहीखेळ फुटकर श्याम महाजन, मंगेश जांभळे, नितीन नरसाराम महाजन, नारायण बायवार ,धनु बायवार, विठ्ठल टवलारे ,नितीन लहाने वासुदेव शेळके, गजानन बोंद्रे सह दहा ते पंधरा शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.

विविध घटनांचा पोलीस तपास चालू आहे शेतकऱ्यांनी सहकार्य करावे, असे अकोट ग्रामीणचे पोलिस निरीक्षक श्रीधर गुट्टे म्हणाले. धाबा माय मंदिर मुख्य रोड लगत शेतातून केबल व शेती उपयुक्त साहित्य चोरले. तक्रारी देऊन सुद्धा पोलीस प्रशासनाकडून शेतकऱ्याला न्याय का मिळत नाही.

**रोशन जायले,**
शेतकरी अकोली जहागीर

शिवपुर कासोद शिवारातील गेल्या वर्षभरात ४० गाई गुरेढोरे चोरीला गेले. गाभण गाय व वासरी चोरून नेली चोरांचा बंदोबस्त करून शेतकऱ्यांना भरपाई नुकसान द्यावी.

**गजानन बोंद्रे,**
शेतकरी शिवपुर

# हेल्मेट सक्तीचा दुहेरी न्याय? 15 ऑगस्टच्या रॅलीने उपस्थित केले सवाल

प्रतिनिधी १६ऑगस्ट

**अकोट :** १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनानिमित्त अकोट शहरात काढण्यात आलेल्या विविध रॅलीदरम्यान हेल्मेट सक्तीच्या नियमांचे पालन झाले का, यावरून आता प्रश्न उपस्थित होत आहेत. रॅलीतील दुचाकीस्वारांकडून हेल्मेटचा वापर न झाल्याचे चित्र समोर आले आहे. विशेष म्हणजे नगर परिषद च्या रॅलीत मुख्याधिकारी, नगरअध्यक्षा, पदाधिकारी व नगरसेवक सहभागी असल्याने हेल्मेट सक्तीचा नियम सर्वांसाठी समान आहे की नाही? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.



शहरात हेल्मेट न घालणाऱ्या सर्वसामान्य दुचाकीस्वारांवर वाहतूक पोलिसांकडून कारवाई करून दंड वसूल केला जात आहे. हेल्मेट वापरण्याबाबत नागरिकांना सक्ती केली जाते. मात्र, सार्वजनिक रॅलीदरम्यानच हेल्मेटच्या नियमांकडे दुर्लक्ष होत असेल तर कायद्याची अंमलबजावणी सर्वांसाठी समान आहे का? असा थेट प्रश्न नागरिक विचारत आहेत. सर्वसामान्यांकडून हेल्मेट नियमभंगाबाबत दंडवसुली केली जात असताना १५ ऑगस्टच्या विविध रॅलीतील नियमभंगाबाबत पोलीस प्रशासनाची भूमिका काय राहणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. या प्रकरणाची दखल घेऊन पोलीस अधीक्षक (एस पी) साहेब काय कारवाई करणार? असा सवाल उपस्थित होत असून, नागरिकांना आता एसपींच्या कारवाईची प्रतीक्षा आहे.

# हातरुण येथे गोवंश चोरटे पुन्हा सक्रिय

प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**हातरूण :** येथे 8 ऑगस्ट रोजी संध्याकाळी शेख अमजद अब्दुल रऊफ रहनार हातरून यांच्या मालकीचे एक वासरु चोरीला गेले. विविध ठिकाणी शोध घेतला, परंतु अद्यापपर्यंत कोणताही ठोस पुरावा मिळाला नाही. शेख अमजद यांनी ९ रोजी उरळ पोलीस स्टेशन मध्ये चोरीची तक्रार दाखल केलेली आहे.

काही. दिवसा आगोदर त्यांची एक गाय चोरी गेली होती पोलिसांनी सदर प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद करुन चोरट्या विरुद्ध गुन्हा नोंद केला आहे घटनेचा पुढील तपास उरळपोलीस करीत आहेत.

# खेंडकर ज्ञानगंगेमधे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी १६ऑगस्ट

**अकोला :** सरस्वती नगर, जुना वशीम बायपास, अकोला येथील खेंडकर ज्ञानगंगेमधे आज १५ ऑगस्ट २०२६ रोजी स्वातंत्र दिन साजरा करण्यात आला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक, प्रमुख पाहुणे आणि कर्मचारी यांच्या उपस्थीतीत मोठ्या उत्साहात आज ८० वा स्वातंत्र दिन स्वतंत्र सेनानी व नेत्यांना मानवंदना करून भारतीय ध्वजाला सलामी देऊन, राष्ट्रगीत व राज्य गिताने साजरा करण्यात आला. खेंडकर विद्यालयाच्या प्रांगणात चिमुकले विद्यार्थी व पालकांसह कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन व ध्वजारोहन संस्थेचे सचिव विष्णुपंत खेंडकर विद्यालयाचे मुख्याध्यापक निलेश खेंडकर यांच्या हस्ते पार पडले. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून स्व. यमुनाबाई खेंडकर प्राथमीक शाळेचे मुख्याध्यापक व महाराष्ट्र राज्य खाजगी शिक्षक संघटनेचे उपाध्यक्ष अल्केश खेंडकर यांची प्रथनीय उपस्थीती होती. तसेच कार्यक्रमाला संस्थेच्या सहसचिव सौ. मृणालिनी खेंडकर, तर संस्थेच्या उपाध्यक्ष सौ अस्मितताई खेंडकर यांची उपस्थिती होती.यावेळी शाळेचा माजी विद्यार्थी सागर दुसाने यांनी भारतीय स्वतंत्र दिनी आपल्या शाळेविषयी आत्मीयता प्रकट करत शाळेला भेटवस्तू प्रदान केली व शाळेचे मुख्याध्यापक यांचे शाल व श्रीफळ देऊन स्वागत केले.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्र संचालन शाळेतील शिक्षीका उशा जगदाळे यांनी केले . या प्रसंगी अध्यक्षांनी आपण स्वावलंबी भारतासाठी सदैव्य तयार असने आवश्यक आहे. प्रत्येक भारतीयांची ही जबाबदारी आहे. आज 15 ऑगस्ट आहे, स्वातंत्र्यासाठी ज्यांनी बलिदान दिलं त्यांचं स्मरण करावे. देशासाठी आपणही काहीतरी केलं पाहिजे असं आपल्याला देखील वाटावे असं मत व्यक्त केले. या प्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक आशा काळे, कांचन वानखडे, सुरेश सुरत्ने, प्रज्ञानंद थोरात, श्रीकांत पागृत, गोपाल वानखडे, प्रशांत काळे, अंजु मुंढे, छाया इंगळे, वर्षा मते, माया खोडके, प्रणाली धोटे, रूपाली उन्हाळे, मेघा इंगळे, शुभांगी दामोदर, अनिता वानखडे, भाग्यश्री भामरे यांची उपस्थिती होती तर शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सहकार्य केले.

# उद्या पहिला श्रावण सोमवार आणि नागपंचमी

प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**अकोला :** पहिला श्रावण सोमवार आणि नागपंचमी असा योग सोमवारी जुळून आला आहे. यासाठी बाजारात लाह्या फुटाणे, नारळ, नागाच्या पूजेसाठी लागणारे फोटो मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाले आहे. ग्राहक तयारी करीत आहेत. तसेच शिवाला प्रिय असणारी बेलाची पाने देखील उपलब्ध आहेत. १०८ बेलाचा पुडा २० ते २५ रुपयांना बाजारात उपलब्ध आहे. ग्राहक रविवार पासून तयारी करीत आहेत. श्रावण महिन्यात शिव आराधना केली जाते. शहराचे ग्रामदैवत राजराजेश्वर मंदिरासह विविध शिव मंदिरात भाविकांची गर्दी राहणार आहे.

# हिवरखेड येथे भारतमाता प्रतिमेचे पूजन



प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**हिवरखेड :** येथील मेनरोडवर भारत माता प्रतिमेचे युवकांनी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून पूजन केले. या चौकाला भारत माता चौक, असे नाव नगरपरिषद कडून देण्यात यावे अशी मागणी भारत माता की जय या घोषणेने युवकांनी केली. यावेळी पोलिस पाटील प्रकाश गावंडे, राजेश पांडव, संतोष शर्मा,निखिल कराळे, अमोल पिसोळे, रोहन झगडे, आकाश मानकर, आदित्य पांडव, दर्शन खिरोडकार, राजनकार, रोहित इंगळे, अरुण कवळकार,कुशल वानखडे, प्रफुल कवळकार,सनी इंगळे, शुभम खिरोडकार,बोबटकार, खारोडे टेलर,यांच्यासह अनेक तरुण उपस्थित होते.

# 'कमवा आणि शिका' या सरकारी योजनेअंतर्गत बहुतांश शिक्षण पूर्ण करणारे गृहमंत्री!

## आर.आर. पाटील यांची आज जयंती

'कमवा आणि शिका' या सरकारी योजनेअंतर्गत बहुतांश शिक्षण पूर्ण करणारे गृहमंत्री!

रावसाहेब रामराव पाटील ऊर्फ आर.आर. पाटील हे महाराष्ट्रातील राजकारणी होते. ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सदस्य, महाराष्ट्र विधानसभा सदस्य (आमदार) व महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री होते. लोकांमध्ये स्वच्छ चारित्र्याचे व प्रामाणिक नेते म्हणून त्यांची वेगळी ओळख होती. १९९० पासून ते २०१५ पर्यंत सांगली जिल्ह्यातील तासगाव कवठेमहांकाळ विधानसभा मतदारसंघाचे आमदार होते. ते गृहमंत्री होऊनही शेवटच्या श्वासापर्यंत आबा म्हणूनच सर्वसामान्यांच्या स्मरणात राहिले. २६ नोव्हेंबर, २००८ रोजी मुंबईवर झालेल्या अतिरेकी हल्ल्यानंतर पत्रकार परिषदेत केलेल्या वक्तव्यांनंतर बेजबाबदार वक्तव्यांसाठी आर.आर. पाटील हे टीकेचे लक्ष्य बनले होते. यानंतर त्यांना उपमुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला.

'आबा' या नावाने प्रसिद्ध असलेले आर.आर. पाटील यांचा जन्म १६ ऑगस्ट १९५७ रोजी महाराष्ट्र राज्यातील सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील आंजणी (तासगांव) या गावात झाला. वडील गावप्रमुख असूनही त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती. 'कमवा आणि शिका' या सरकारी योजनेअंतर्गत त्यांनी आपले बहुतांश शिक्षण पूर्ण केले. त्यांनी सांगलीच्या शांतीनिकेतन कॉलेजमधून बीए आणि एलएलबी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले.

रावसाहेब रामराव पाटील उर्फ आर. आर. पाटील आज त्यांचा जन्मदिन... लोक प्रेमाने त्यांना आबा म्हणत.. तीच होती त्यांची खरी ओळख. आबा अखेरपर्यंत आबाच राहिले त्यांनी आपला आबासाहेब होऊ दिला नाही हेच त्याचं वेगळेपण. जिल्हा परिषद सदस्य, सहा वेळा आमदार, ग्रामविकास मंत्री, गृहमंत्री, उपमुख्यमंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष असा सत्तापदांचा प्रवास करुनही आबा शेवटपर्यंत आबाच राहिले.

गरिब शेतकरी कुटुंबातल्या या होतकरु तरुणाचे नेतृत्वगुण सुरवातीला हेरले ते वसंतदादा पाटलांनी. कोणतीही राजकीय पाश्वभुमी नसतांनाही मनाला भिडणारी भाषणशैली, स्वच्छ प्रतिमा आणि समाजासाठी काही करण्याची जिद्द यांच्या जोरावर आबा पाटलांनी राजकारणात वाटचाल सुरु केली. वसंतदादांबरोबरच यशवंतराव चव्हाण यांचीही प्रेरणा आर. आर. पाटील यांना होती. आर. आर. पाटील हे पहिल्यांदा १९७९ साली सावळज मधून जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून आले. १९७९ ते १९९० पर्यंत ते जिल्हा परिषद सदस्य होते. मग १९९० ते २०१४ या काळात ते सतत विधानसभेवर निवडून आले. तासगाव मतदार संघातून काँग्रेस पक्षाच्या तिकिटावर आबा १९९० साली पहिल्यांदा विधान सभेवर निवडून आले. आर. आर. पाटील हे १९९५ साली कॉंग्रेसच्या तिकिटावर दुसऱ्यांदा आमदार झाले. तेव्हा भाजप-शिवसेनेचे युती सरकार सत्तेत होते. राजकीय आयुधांचा वापर करत आबांनी त्यावेळी विधानसभा दणादून सोडली आणि सत्ताधारी भाजप-शिवसेनेला कोंडीत पकडले.



अभ्यासू आणि स्वच्छ आमदार अशी सार्थ ओळख आबांनी निर्माण केली होती. नंतर शरद पवारांसोबत आबांनी काँग्रेस सोडत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला तो १९९९ च्या सुमारास. याच काळात शरद पवार यांचे विश्वासू आणि कट्टर समर्थक अशी आर. आर. पाटील यांची ओळख निर्माण झाली. आबांनी २००४, २००९ आणि २०१४ ची आमदारकीची निवडणुक अटीतटीने लढत जिंकली. सुरवातीला तासगाव आणि नंतर कवठेमहांकाळ मतदारसंघाचं त्यांनी प्रतिनिधित्व केलं. आमदारकीबरोबरच त्यांची मंत्रीपदाची कारकिर्दही गाजली.

आर. आर. पाटील यांना काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सरकारमध्ये सुरवातीला ग्रामविकास मंत्रीपदाची जबाबदारी देण्यात आली. गाडगे महाराज स्वच्छता अभियान यशस्वीपणे राबवून आर आर पाटील यांनी वेगळी ओळख निर्माण केली. पुढे राज्याचं गृहमंत्रीपद आणि उपमुख्यमंत्रीपदही त्यांनी जबाबदारीने सांभाळले. मुंबईवरच्या दहशतवादी हल्ल्यानंतर त्यांच्या काही वक्तव्यांनी वाद झाले आणि आबांना गृहमंत्रीपद आणि उपमुख्यमंत्रीपदही सोडावे लागले. पण आबांची स्वच्छ प्रतिमा कायम राहिली. गृहमंत्री असतांना डान्सबार बंद करण्याचा क्रांतिकारी निर्णय घेऊन आबांनी अनेक संसार सावरले. डान्स बार बंद करण्याच्या निर्णयाला विरोधही झाला पण आबा ठाम राहिले.

गृहमंत्रीपदाच्या काळात त्यांनी राबवलेले महात्मा गांधी तंटामुक्त अभियानही अभिनव होते. गाडगेबाबा, महात्मा गांधी, यशवंतराव चव्हाण यांच्यापासून प्रेरणा घेत गरीब शेतकरी कुटुंबातले आर. आर. पाटील सत्तेच्या राजकारणात राहुनही साधेच राहिले. साधेपणा हेच त्याचं वैशिष्ठय होते. याच साधेपणातून ते तळागाळातल्या कार्यकर्त्यांशी संवाद साधत. सत्ता येते आणि जाते पण सोबत राहतात ती जोडलेली माणसे हे आर. आर. पाटील यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षाची जबाबदारीही त्यांनी समर्थपणे सांभाळली. कार्यकर्त्यांशी संवाद साधत पक्ष वाढवला.

आबा सत्तेची एक एक पायरी चढत गेले पण कुटुंबाने आबांप्रमाणेच आपला साधेपणा टिकवून ठेवला. पत्नी सुमन, मुलगा रोहित आणि मुलगी स्मिता, आई भागिरथी यांनी वागण्याबोलण्यात सत्तेचा दर्प येऊ दिला नाही. आबांचे एक भाऊ सुरेश हे गावाकडे शेती बघतात. तर दुसरे भाऊ राजाराम पोलिस दलात आहेत. आबा गृहमंत्री असतांना आबांचे भाऊ राजाराम पाटील पोलिस दलात कुठलाही बडेजाव न करता सेवा बजावत होते. तोंडाच्या कर्करोगाशी दीर्घकाळ लढा दिल्यानंतर पाटील यांचे लीलावती हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर येथे निधन झाले. पाटील यांच्यावरील प्राथमिक उपचारानंतर त्यांच्यात सुधारणा झाल्याचे दिसून आले आणि जानेवारी २०१५ मध्ये त्यांना लाइफ सपोर्ट काढून घेण्यात आला. परंतु १६ फेब्रुवारी २०१५ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

# सिटी न्यूज अकोला

३

रविवार, दि. १६ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com


# शहरात 80 वा स्वातंत्र्यदिन अत्यंत उत्साहात

प्रतिनिधी १ ६ ऑगस्ट

**अकोला :** स्वातंत्र्यानंतर देशाने मोठी प्रगती केली आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, महिला सक्षमीकरण, संरक्षण, अंतराळ अशा विविध क्षेत्रांत भारत आत्मनिर्भरतेच्या दिशेने वाटचाल करत आहे. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वात भारताची सर्वांगीण प्रगती होत आहे. तर दुसरीकडे राज्यातही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य प्रत्येक क्षेत्रात पुढे जात आहे. नुकतीच शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यात आले असून ही शासनाची मोठी कामगिरी आहे, असे प्रतिपादन जिल्ह्याचे पालकमंत्री तथा कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी केले.

देशाचा ८० वा स्वातंत्र्यदिन शनिवारी अकोल्यात अत्यंत उत्साह आणि देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. जिल्ह्याचा मुख्य शासकीय सोहळा जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात आयोजित करण्यात आला होता. सोहळ्याची सुरुवात वंदे मातरमच्या सामूहिक गायनाने झाली.

## जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्र्यांच्या हस्ते झाले ध्वजारोहण



यानंतर पालकमंत्री आकाश फुंडकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. पोलीस बँडच्या धुनवर राष्ट्रगीत झाले आणि राष्ट्रध्वजाला सलामी देण्यात आली. त्यानंतर राज्यगीत सादर करण्यात आले.

ध्वजारोहणानंतर पालकमंत्री आकाश फुंडकर यांनी सशस्त्र पोलीस दलाची पाहणी करत सलामी स्वीकारली. या सोहळ्याला जिल्हाधिकारी वर्षा मीना, जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनय नावंदर, वरिष्ठ अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, स्वातंत्र्य सैनिक आणि लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

स्वातंत्र्यदिनानिमित्त पोलीस दलातील अधिकाऱ्यांना उत्कृष्ट सेवेसाठी पदके प्रदान करण्यात आली. पोलीस उत्कृष्ट सेवेसाठी पदक प्राप्त लोकल क्राईम ब्रांचचे माजी अधिकारी शंकर शेळके यांचा पालकमंत्र्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

स्वातंत्र्यदिन सोहळ्यादरम्यान पालकमंत्री आकाश फुंडकर यांनी उपस्थित नागरिक व अधिकाऱ्यांना जलसंधारण सप्ताहाची शपथ दिली. जलसंधारणाबाबत जनजागृती वाढवण्याच्या उद्देशाने आयोजित सप्ताहाच्या बोधचिन्हाचे (लोगो) अनावरणही त्यांच्या हस्ते करण्यात आले.

अकोला जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अधिक प्रभावीपणे राखण्यासाठी अकोला पोलीस दलाच्या ताफ्यात १८ नवीन वाहने समाविष्ट करण्यात आली आहेत. या सर्व गाड्यांचे लोकार्पण पालकमंत्री फुंडकर यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी पालकमंत्री आकाश फुंडकर यांनी उपस्थित स्वातंत्र्यसैनिक, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आणि अधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी स्वातंत्र्यसैनिक, शहीद जवानांचे नातेवाईक आदींचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

# न्यू इंग्लिश हायस्कूल व क. महाविद्यालयाच्या प्रांगणात 80 वा स्वातंत्र्य दिन साजरा

प्रतिनिधी १ ६ऑगस्ट



**अकोला :** अकोला एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड.गिरीश देशपांडे यांच्या हस्ते न्यू इंग्लिश हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे कार्याध्यक्ष विलास देशपांडे, उपाध्यक्ष डॉ.विजय नानोटी ,प्रा.किशोर जोशी, डॉ.सहदेव रोठे,सचिव शार्दुल दिगंबर, सह सचिव पातुरकर, परांजपे, सौ.रमणी जोशी , प्राचार्य श माधव मुनशी, उप प्राचार्य हातवळणे उपस्थित होते.

या प्रसंगी लो.टिळक सभागृहात कला शिक्षक वाघमारे, वाकोडे व इतर शिक्षिकांनी अकोला एज्युकेशन सोसायटी व न्यू इंग्लिश हायस्कूलच्या शतक महोत्सवी वर्षात पदार्पण करत असतांना स्थापन करण्यात आलेल्या विविध शाळा, महाविद्यालय, विज्ञान व तंत्रज्ञान केंद्राच्या बद्दल चा चित्ररुपी प्रवास रांगोळी द्वारे उत्तमरीत्या रेखाटला.

ॲड.गिरीश देशपांडे यांनी स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व व थोर महापुरुषांनी दिलेल्या बलिदानाचे महत्व विषद केले. व सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी वंदे मातरम् गीत,संविधानाची उद्देशिका, महाराष्ट्र गीताचे सर्वांनी गायन केले.न्यू इंग्लिश हायस्कूल मधील गुणवंत विद्यार्थ्यांना डॉ.राहुल लाखे यांच्या हस्ते रोख बक्षीस देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन खंडारे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.रत्नपारखी यांनी केले.

# पोलिस कर्मचाऱ्याला स्वातंत्र्य दिनी एका इसमाकडून शिवीगाळ, चावा घेतला

प्रतिनिधी १६ ऑगस्ट

हिवरखेड : येथील ट्रॅफिक पोलिस धीरज साबळे १५ ऑगस्टच्या दुपारी कर्तव्य बजावत असताना, त्यांनी एका बजाज प्लेटिना मोटरसायकल स्वराला हेल्मेट व गाडीचे कागदपत्रे बाबत अशी विचारणा केली.

त्या इसमाने ट्रॅफिक पोलिसाशी हुज्जत घातली. चिडून पोलिस कर्मचाऱ्याला गालाला चावा घेतला, धीरज साबळे यांनी सदर इसमाला ताब्यात घेतले व फिर्याद नोंदवली. आरोपी दीपक रामकृष्ण चोंडेकर रा हिवरखेड यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. तपास पीएसआय गोपाल गिलबिले हे करीत आहेत. पोलिसांचा वचक कमी पडला का? सदर आरोपी दारू पिलेला सुद्धा दिसत होता. स्वातंत्र्य दिनी तर दारूची दुकाने बंद असतात मग हा दारू कुठून पिला असे प्रश्न निर्माण झाले. याबाबत वरिष्ठांनी सखोल चौकशी करून दारूमुक्त परिसर करावा अशी मागणी केली. पोलिस सुरक्षित नसतील तर सामान्य माणसाचे काय अशी विचारणा झाली.

# महापालिकेत साजरा झाला देशाचा स्वातंत्र्यदिन

प्रतिनिधी १६ ऑगस्ट



महापौरांच्या हस्ते ध्वजारोहण

**अकोला :** महापालिकेत देशाचा ८० वा स्वातंत्र्यदिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. महापौर शारदा खेडकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी उपस्थितांनी राष्ट्रगीत गाऊन राष्ट्रध्वजाला सलामी दिली.

याप्रसंगी महापालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने प्रामुख्याने उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर उपस्थित सर्व कर्मचाऱ्यांनी तसेच नगरसेवकांनी राष्ट्रगीत गाऊन राष्ट्रध्वजाला सलामी दिली. आपल्या भाषणात महापौर व महापालिका आयुक्तांनी उपस्थितांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला महापालिकेचे सर्व अधिकारी, कर्मचारी आणि काही नगरसेवकही उपस्थित होते. याप्रसंगी शालेय विद्यार्थ्यांनी साहसी खेळांचे प्रात्यक्षिक दाखवून उपस्थितांची वाहवा मिळवली.

# दीपक बोडखे यांचा शिवसेनेत प्रवेश

वि . प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**अकोट :** अकोला जिल्ह्यातील राजकीय घडामोडींना वेग देणाऱ्या एका महत्त्वपूर्ण घटनाक्रमात वंचित बहुजन आघाडीचे नेते तथा माजी राज्यमंत्री रामदास बोडखे यांचे चिरंजीव दीपक बोडखे यांनी शिवसेना (शिंदे गट) पक्षात प्रवेश केला. मुंबई येथील नंदनवन येथे आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडला.

या प्रसंगी प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते तथा आमदार बच्चूभाऊ कडू, शिवसेनेचे आमदार व अकोला लोकसभा संपर्क प्रमुख डॉ. राजन साळवी, अकोट विधानसभा संपर्क प्रमुख डॉ. विशाल इंगोले यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

दीपक बोडखे हे गेल्या काही वर्षांपासून सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सक्रिय असून अकोट विधानसभा क्षेत्रात त्यांनी स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. वंचित बहुजन आघाडीच्या माध्यमातून त्यांनी विविध सामाजिक प्रश्नांवर भूमिका मांडत जनसंपर्क वाढविला होता. त्यांच्या शिवसेनेतील प्रवेशामुळे अकोटच्या राजकीय समीकरणांमध्ये बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दीपक बोडखे यांच्यासोबत प्रहार अकोला जिल्हाध्यक्ष कुलदीप पाटील वसू, श्रीजीत उर्फ छोटू कराळे तसेच शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. या सामूहिक पक्षप्रवेशामुळे शिवसेनेच्या संघटनात्मक ताकदीत भर पडणार असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे. अकोला जिल्ह्यातील विविध राजकीय पक्षांमध्ये सुरू असलेल्या पक्षांतरांच्या पार्श्वभूमीवर दीपक बोडखे यांचा शिवसेनेतील प्रवेश हा चर्चेचा विषय ठरला आहे.

## अकोटच्या राजकारणात नव्या समीकरणांची चर्चा



# बार्शीटाकळी येथे स्वातंत्र्य दिन साजरा



प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**बार्शीटाकळी :** पोलीस स्टेशन मध्ये डीवायएसपी आनंद कांदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तर, बार्शीटाकळी नगरपंचायत येथे नगर अध्यक्ष अलिमा कातून अलीमुद्दीन यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळेस बार्शीटाकळीचे सीओ, अधिकारी, कर्मचारी व नगरसेवक उपस्थित होते. नगरपंचायत मध्ये कर्मचाऱ्यांना किट वाटप करण्यात आली. सरकारी रुग्णालयात डॉ. रूपाली शेखर खोंडे, डॉ. आर्य, डॉ. आदिती व डॉ. आयशा वाघ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तहसील कार्यालयात बार्शीटाकळीचे नवीन एसडीओ डॉ. मिलिंद जगदाळे यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. तहसील कार्यालय जय जय महाराष्ट्र माझा या देशभक्ती गीताने तहसील कार्यालय परिसर दुमदुमून गेला. गावात अतिशय उत्साहपूर्ण वातावरण होते.

# हिवरखेड येथे ठिकठिकाणी स्वातंत्र्य दिन साजरा



प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**हिवरखेड :** येथे १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

गावातील नगरपरिषद, जिप शाळा, विविध महाविद्यालये, सरस्वती प्राथमिक शाळा, देशमुख इंटरनेशनल स्कूल, सहदेवराव भोपळे विद्यालय, इत्यादीसह शासकीय,खाजगी शाळा,पोलिस स्टेशन, सोसायटी, कृषी विभाग, प्राथमिक रुग्णालय, यासह शासकीय निमशासकीय स्थळी ध्वजारोहण करून तिरंगा झेंड्याला सलामी देण्यात आली.

# राष्ट्रध्वजाला मानवंदना



**अकोला :** भारतीय माजी सैनिक संघटना, जिल्हा अकोलाच्या वतीने स्वातंत्र्य दिनानिमित्त शनिवार, १५ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता, संघटनेच्या कार्यालयात (सिंधी कॅम्प, पाटील दूध डेअरी जवळ, अकोला) राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात येईल.

या कार्यक्रमाचे आयोजन संघटनेचे अध्यक्ष सुभेदार विष्णू डोंगरे (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात येणार आहे. या प्रसंगी जिल्ह्यातील आजी-माजी सैनिक, वीर माता, वीर पिता, वीर पत्नी तसेच देशभक्त नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून राष्ट्रध्वजाला मानवंदना द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. तिरंगा कोट्यवधी भारतीयांच्या अभिमानाचे, स्वाभिमानाचे आणि राष्ट्रभक्तीचे प्रतीक आहे. "हर घर तिरंगा, हर घर आजादी का अमृत महोत्सव" या भावनेतून प्रत्येक स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करावा असे आवाहन केले आहे.

# लालबहादूर शास्त्री ज्ञानपीठात स्वातंत्र्यदिन साजरा



वि. प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**अकोट :** लालबहादूर शास्त्री ज्ञानपीठ येथे भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन सोहळा मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष नवनीत लखोटिया होते. यावेळी उपाध्यक्ष लूणकरण डागा, सचिव प्रमोदजी चांडक, सदस्या शारदा लखोटिया, कोषाध्यक्षा रेखा चांडक, दीपम लखोटिया, अवनी लखोटिया तसेच शाळेचे मुख्याध्यापक रामेश्वरजी पातोंड, इंचार्ज विशाल चांदूरकर, बचपन स्कूलच्या मुख्याध्यापिका मन्नी आणि निलिमा देशमुख उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते ध्वजपूजनाने झाली. तिरंग्याला सलामी देऊन सामूहिक राष्ट्रगीत सादर करण्यात आले. इयत्ता ९ वी व १० वीच्या विद्यार्थ्यांनी आकर्षक परेडद्वारे मानवंदना दिली.

इयत्ता १ ली व २ रीच्या विद्यार्थ्यांनी 'विविधतेत एकता' हा संदेश देणारे सादरीकरण केले. इयत्ता ८ वीच्या विद्यार्थिनींनी 'रिंग रोलिंग' प्रात्यक्षिक सादर केले. इयत्ता ३ री व ४ थीच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर सुंदर नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश शर्मा यांनी केले. मुख्याध्यापक रामेश्वर पातोंड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दिक्षिता चोपडे यांनीही विचार व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात दीपम लखोटिया यांनी विद्यार्थ्यांच्या सहभागाचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन किरण शेगोकार यांनी केले.

# मोठी उमरी येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर

प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**अकोला :** ज्येष्ठ नागरिक विचार मंच आणि संत श्री गुरु रविदास महाराज मंदिर, मोठी उमरीतर्फे मोफत आरोग्य तपासणी व आरोग्य समुपदेशन शिबिराचे आयोजन १६ ऑगस्ट रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १ वाजेपर्यंत गुरु रविदास मंदिर, अग्रवाल लेआउट, ओम सुपर शॉपीजवळ, मोठी उमरी, अकोला येथे होणार आहे.

सदर शिबीर डॉ.आरती कुलवाल जिल्हा शल्य चिकित्सक अकोला यांचे सहकार्य तसेच अकोला जिल्हा हिवताप कार्यालय , जिल्हा कुष्ठरोग निवारण कार्यालय,जिल्हा क्षयरोग कार्यालय अकोला यांच्या सौजन्यासह खाजगी क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टरांचे सहकार्य या माध्यमातून आयोजित करण्यात येत असल्याचे आयोजकांनी कळविले आहे.

## निधन वार्ता

**केदारनाथ अग्रवाल**

अकोला. येथील आदर्श कॉलनीतील रहिवासी केदारनाथ गंगाधरजी अग्रवाल ८६, यांचे निधन झाले. शरद आणि समीर अग्रवाल यांचे ते वडील होत.


## महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला
## सिलबंद निविदा सुचना क्र. १ ०/ २ ० २६ - २ ० २७ (सिलबंद )

जावक क्रमांक ५ २७०/सिलबंद नि.सु.क्र.१ ०/ निलि / २०२६ / दिनांक १८/०८/२००८

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला (दुरध्वनी क्रमांक (०७२४- २४३५१९५)
e-mail- akola.ee@mahapwd.gov.in हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचे कडुन खालील कामांकरीता ब-१ नमुन्यातील सिलबंद निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत.

| अ.क्रं. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | अकोला जिल्हयातील गांधी ग्राम जवळ पूर्णा घाट चे बळकटीकरण करणे जि. अकोला | ८७६५६३ |
| २ | मुर्तिजापूर येथील तालुका कृषि विभाग कार्यालयाचे बळकटीकरण करणे ता. मुर्तिजापूर | ८३९३७४ |
| ३ | मुतिजापूर येथील तालुका कृषि विभाग कार्यालय परिसराचे बळकटीकरण करणे ता. मुर्तिजापूर | ८२७४४८ |
| ४ | पातूर येथील विश्रामगृहा करीता आवारभितीची दुरुस्ती करणे ता. पातूर | ८२७०४० |
| ५ | सि.आर. अंतर्गत जिल्हा न्यायाधिश बंगल्याची दुरुस्ती करणे | ८०६८२१ |
| ६ | एस.डी.आर. अंतर्गत कारागृह येथील गोडावून व स्टोअर रुमची दुरुस्ती करणे | ७५४३३९ |
| ७ | अकोला येथील सिव्हील लाईन पोलीस स्टेशनची दुरुस्ती करणे | ५७५७०१ |
| ८ | अकोला येथील विकास बंग्ल्याची दुरुस्ती करणे | ५०८००५. |
| ९ | अकोला येथील लेडी हाडीग समोरील कांचनगंगा इमारतीची दुरुस्ती करणे. | ४४४००९ |
| १० | बाळापूर येथील सत्र न्यायालयाची दुरुस्ती करणे ता. बाळापूर | ४०२३१६ |
| ११ | पातूर येथील विश्रामगृह, तहसिल कार्यालय, पोलीस स्टेशन चान्नी, सिव्हील कोर्ट पातूर, आय.टी.आय. इमारत पातूर, ग्रामिण रुग्णालय चतारी, पोलीस स्टेशन पातूर, उपकोषागार कार्यालय पातूर, सा.बां. उपविभाग कार्यालय, इ. ची दुरुस्ती करणे. ता. पातूर | ३३३१३९ |
| १२ | अकोला येथील अकोट फैल पोलीस स्टेशन, सिटी कोतवाली पोलीस स्टेशन, जुने शहर पोलीस स्टेशन, डाबकी रोड पोलीस स्टेशन, हेड क्वॉर्टर, खदान पोलीस स्टेशन, सिव्हील लाईन पोलीस स्टेशन, बोरगांव मंजू पोलीस स्टेशन. एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन, ताजनापेठ पोलीस स्टेशन, जुने एस.पी. कार्यालय व नविन एस.पी. कार्यालय, जयहिंद चौक व सातव चौक इ. झेंडयाची दुरुस्ती करणे | ४३१६४० |
| १३ | अकोला येथील चॅरीटी कमिशनर कार्यालयाची दुरुस्ती करणे | २७०८६३ |
| १४ | अकोला येथील एन.सी.सी. ११ महा बटालियन कार्यालयाची दुरुस्ती करणे | १९८७५७ |
| १६ | मौ. शेलू वेताळ येथील शेलू वेताळ मंदीराची दुरुस्ती करणे ता. मुर्तिजापूर | १५९२०२ |

**अटी व शती**
**तपशिल खालील प्रमाणे-**
१. या कामांची कोरी निविदा प्रपत्रे www.mahapwd.com या संकेत स्थळावर pay PWD online या लिंक वर payment Gateway व्दारे काम क्रं. ०१ ते १५ दिनांक १९/०८/२०२६ ते दिनांक २६/०८/२०२६ पर्यंत डाऊनलोड करण्या करीता उपलब्ध आहे.
२. वरीलप्रमाणे डाऊनलोड केलेल्या निविदा प्रपत्राची छायांकित प्रत दोन लिफाफा पध्दतीनुसार कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, अकोला यांचे कार्यालयात काम क्रं.०१ ते १५ दिनांक २७/०८/२०२६ पुर्वी / त्या दिवशी १८.०० वा. पर्यंत स्वीकारण्यांत येतील.

**अटि व शर्ती**
१. नमुद कामाचे कोरी निविदा प्रपत्रांचे शुल्क www.mahapwd.com या संकेत स्थळावर pay PWD online या लिंक वर नाव नोंदणीकृत करुन paymeni Gateway व्दारे भरणा करावे. तद्नंतर भरणा केलेल्या निविदा प्रपत्राची डाऊनलोड कॉपीची छायांकित प्रत स्वाक्षरी तथा इच्छुक दर नमुद करुन व भरणा केलेल्या शुल्काच्या पावतीसह वरील दिनांकाचं आंत विभागीय कार्यालयात दोन लिफाफा पध्दतीनुसार सिलबंद लिफाफा सादर करावा.
२. इसारा रक्कम राष्ट्रीयकृत बँकची एक वर्ष मुदतीचे टर्म डिपॉझीट रिसीप्ट स्वरूपात कार्यकारी अभियंता सा. बा. विभाग अकोला यांचे नांवे रेखांकित केलेला असावा.
३. निविदा सादर केल्याच्या दिनांकापासून निविदा ३० दिवसापर्यंत विधीग्राहय राहील.
४. केलेल्या कामाच्या देयकाचे भुगतान उपलब्ध निधी नुसारच करण्यांत येईल.
५. कोणतेही कारण न दर्शविता एक अथवा सर्वच निविदा स्विकारण्याचा / नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार निम्नस्याक्षरीकारांनी राखुन ठेवला आहे.
६. वरील निविदा सुचना सा.बां. विभागाच्या संकेत स्थळावर http://mahatenders.gov.in वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**(प्रसाद पाटील)**
कार्यकारी अभियंता,
सा. बां. विभाग, अकोला

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. १६ ऑगस्ट २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

## क्षुल्लक कारणातून मारहाण; चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**उमरखेड** : दोन तरुणांमध्ये झालेल्या किरकोळ वादाचे पर्यवसान मारहाणीत झाले. महात्मा फुले वॉर्डात काल रात्री दहाच्या सुमारास एका तरुणाला रॉड, खंजर व लाठीने मारहाण करून गंभीर जखमी केल्याची घटना घडली. या प्रकरणी दोन्ही गटांच्या तक्रारीवरून पोलिसांनी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. वैभव अनिल जयस्वाल हे रमेश शिंदे यांच्या घराजवळ थांबले असताना मुन्ना ऊर्फ अनिकेत दत्ता खंदारे याच्यासोबत त्यांचा वाद झाला. यावेळी शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचे जयस्वाल यांनी तक्रारीत म्हटले आहे. त्यानंतर अनिकेत खंदारे, अंकुश खाडे व आदित्य बाळू पवार यांच्यासह अन्य काही जण तेथे आले. त्यांनी रॉड, लाठी व खंजरने डोक्यावर आणि हातावर मारहाण केल्याने जयस्वाल गंभीर जखमी झाले. दरम्यान, अनिकेत खंदारे यांनीही पोलिसांत तक्रार दिली. धक्का लागण्याच्या कारणावरून वैभव जयस्वाल यांनी शिवीगाळ करून स्टीलच्या ग्लासने मारहाण केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या तक्रारीवरून जयस्वाल यांच्याविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला.

# यवतमाळला राज्यातील आदर्श जिल्हा बनविण्याचा संकल्प

### पालकमंत्री संजय राठोड यांचे प्रतिपादन : स्वातंत्र्यदिनी ध्वजारोहण, विविध उपक्रमांचा आढावा

प्रतिनिधी १६ ऑगस्ट





**यवतमाळ** : शासन, प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांच्या सामूहिक सहभागातून यवतमाळ जिल्ह्याला कृषी, उद्योग, शिक्षण, आरोग्य, रोजगार, जलसंधारण आणि पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात राज्यातील आदर्श जिल्हा बनविण्याचा संकल्प करूया, असे आवाहन पालकमंत्री तथा मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी केले.

देशाच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी त्यांनी नागरिकांना संबोधित केले. आमदार दुष्यंत चतुर्वेदी, नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी उईके, जिल्हाधिकारी विकास मीना, पोलीस अधीक्षक कुमार चिंता, मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, मुख्य वनसंरक्षक किशोर मानकर यांच्यासह स्वातंत्र्यसैनिक, माजी सैनिक, लोकप्रतिनिधी, अधिकारी-कर्मचारी, युवक, महिला, पत्रकार व नागरिक उपस्थित होते.

**४३ हजार ६४७ शेतकऱ्यांना ३७४ कोटी :** खरीप हंगामात जिल्ह्यात ८ लाख ६५ हजार हेक्टरवर पेरणी झाली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील ४३ हजार ६४७ शेतकऱ्यांच्या खात्यात ३७४ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. ८२ हजारांहून अधिक शेतकऱ्यांना १ हजार २१ कोटी रुपयांचे खरीप पीककर्ज वाटप झाल्याचे राठोड यांनी सांगितले.

**जलसंधारणावर भर :** जिल्ह्यातील ७३ सिंचन प्रकल्पांत ७० टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत १३ हजारांहून अधिक कामांना मंजुरी देण्यात आली असून, १० हजारांहून अधिक कामे पूर्ण झाली आहेत. यासाठी १२७ कोटी रुपये खर्च झाले आहेत. जलसंधारण सप्ताहाला सुरुवात झाली असून २१ ऑगस्टला 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर' आयोजित करण्यात येणार आहे.

**आरोग्य, शिक्षण व रोजगारालाही चालना :** जिल्ह्यातील १२ लाख ५३ हजारांहून अधिक लाभार्थ्यांना आयुष्मान गोल्डन कार्ड वितरित करण्यात आले असून ६४ रुग्णालये योजनेशी संलग्न आहेत. विद्यार्थ्यांसाठी 'सुपर ५०' उपक्रमातून जेईई व नीट परीक्षांसाठी मोफत निवासी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. महिला बचत गटांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी खाऊगल्ली उभारण्यात येत आहे. याशिवाय ८ हजार ७६७ शेत पाणंद रस्ते, ३८५ स्मशानभूमी कामांना मंजुरी, क्रीडा सुविधांचा विकास, पोलीस दलासाठी २० कोटी ९८ लाखांचा निधी तसेच वर्धा-यवतमाळ-नांदेड रेल्वे मार्ग व शक्तीपीठ महामार्गाच्या भूसंपादनाला गती देण्यात येत असल्याची माहिती राठोड यांनी दिली.

### वीर मातांसह अधिकारी-कर्मचाऱ्याचा गौरव

■ यावेळी वीर माता व वीर पत्नींचा सन्मान करण्यात आला. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. जिल्हा शोध व बचाव पथकाच्या आपत्कालीन सेवा वाहनाचे लोकार्पण करण्यात आले. तसेच पालकमंत्र्यांच्या मातोश्री प्रमिलादेवी दुलीचंद राठोड यांच्या स्मृतिप्रित्यर्थ नंददिप फाउंडेशनला रुग्णसेवा वाहन भेट देण्यात आले.

### पूरग्रस्तांना लवकरच नुकसानभरपाई

■ ३० व ३१ जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे शेती व जमिनीच्या नुकसानीचे प्राथमिक पंचनामे पूर्ण झाले असून, बाधित शेतकऱ्यांना लवकरच नुकसानभरपाई देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. घर व दुकानांच्या पुरामुळे झालेल्या नुकसानीसाठी वाढीव भरपाई देण्याचा निर्णयही शासनाने घेतला आहे.

## लाच घेताना महावितरणच्या कार्यकारी अभियंत्याला अटक

### पुसद येथील विद्युत भवनातील निवासस्थानी एसीबीची कारवाई : २० लाखांच्या कामांच्या देयकांसाठी मागितली होती २० टक्के लाच

प्रतिनिधी १६ ऑगस्ट



**यवतमाळ :** महावितरणच्या पुसद विभागातील कार्यकारी अभियंत्याला चार लाख रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पथकाने शुक्रवारी (१४ ऑगस्ट) सायंकाळी रंगेहात पकडले. जनार्दन लालू चव्हाण (५७) असे कारवाई करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे नाव आहे. चव्हाण हे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या पुसद विभागात कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत आहेत.

एसीबीकडे एका कंत्राटदाराने याबाबत तक्रार केली होती. तक्रारदाराला महावितरणच्या पुसद उपविभागांतर्गत ब्रेकडाऊन व देखभाल-दुरुस्तीची सुमारे २० लाख रुपये किमतीची नऊ कामांची कार्यादेश देण्यात आले होते. या कामांची बिले मंजूर करून देयकाची रक्कम मिळवून देण्यासाठी कार्यकारी अभियंत्याने एकूण रकमेच्या २० टक्के प्रमाणे चार लाख रुपये लाचेची मागणी केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले होते.

**तक्रारीची पडताळणी करून सापळा :** तक्रार प्राप्त झाल्यानंतर एसीबीच्या पथकाने शुक्रवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास पुसद येथील विद्युत भवनातील कार्यकारी अभियंत्याच्या निवासस्थानी तक्रारीची पडताळणी केली. यावेळी चार लाख रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर सायंकाळी लाच स्वीकारण्याचे मान्य करण्यात आल्याचे एसीबीने सांगितले.

त्यानुसार शुक्रवारी सायंकाळी सुमारे ७.१५ वाजता विद्युत भवनातील कार्यकारी अभियंत्याच्या निवासस्थानी सापळा रचण्यात आला. यावेळी जनार्दन चव्हाण यांना तक्रारदाराकडून चार लाख रुपयांची लाच स्वीकारताना पथकाने रंगेहात पकडले.

**लाचेची मागणी केल्यास संपर्क साधावा :** नागरिकांनी कोणत्याही शासकीय अधिकारी अथवा कर्मचाऱ्याने लाचेची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन विभागाने केले आहे.

### घरझडतीची कारवाई सुरू

■ कारवाईनंतर चव्हाण यांना ताब्यात घेण्यात आले असून, पुसद शहर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यातील कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान, आरोपीच्या निवासस्थानी घरझडतीची कारवाईही सुरू असल्याची माहिती एसीबीने दिली.

### कारवाई करणारे पथक

■ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावतीचे पोलीस अधीक्षक बापू बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पर्यवेक्षक अधिकारी म्हणून पोलीस उपअधीक्षक राजेश राठोड, तर सापळा अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक संजय शिंदे यांनी कारवाई केली. पथकात पोलीस उपअधीक्षक मंजुषा भोसले, पोलीस निरीक्षक रविंद्र सहारे, पोलीस अंमलदार अभय वाघ, वैभव जायले, मोहन ठाणेकर, राजेश बहिरट, उमेश बुजाडे आणि वाहनचालक यांचा समावेश होता.

## बोरगाव धरणात बुडून दोन तरुणींचा मृत्यू

### एकीला वाचविण्याच्या प्रयत्नात दुसरीही पाण्यात : बचाव पथकाने मृतदेह बाहेर काढले

प्रतिनिधी १६ ऑगस्ट







**यवतमाळ** : शहरालगतच्या बोरगाव धरण परिसरात फिरण्यासाठी गेलेल्या दोन २१ वर्षीय तरुणींचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी (१४ ऑगस्ट) सायंकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मोहिनी नागोराव गोत्रे (२१, रा. भोसा रोड, यवतमाळ) आणि अमृता अशोक खेडकर (२१, रा. महात्मा फुले महाविद्यालयासमोर, धामणगाव रोड) अशी मृत तरुणींची नावे आहेत. दोघीही यवतमाळ येथील वाधवानी फार्मसी महाविद्यालयातील विद्यार्थिनी असल्याची माहिती आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, शुक्रवारी दुपारी सुमारे चार वाजण्याच्या सुमारास महाविद्यालयातील काही तरुण-तरुणी बोरगाव धरण परिसरात फिरण्यासाठी गेले होते. यावेळी दोन्ही तरुणी पाण्यात उतरल्या. पाण्याचा अंदाज न आल्याने एका तरुणीचा तोल गेला आणि ती पाण्यात बुडू लागली. तिला वाचविण्यासाठी दुसऱ्या तरुणीने प्रयत्न केला. मात्र, या प्रयत्नात दोघीही पाण्यात बुडाल्या.

घटनेची माहिती मिळताच आपत्ती व्यवस्थापन विभागाचे जिल्हा शोध व बचाव पथक तसेच अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. पथकाने शोधमोहीम राबवून दोन्ही तरुणींचे मृतदेह पाण्याबाहेर काढले. या घटनेची माहिती मिळताच महाविद्यालयीन विद्यार्थी आणि त्यांच्या कुटुंबीयांमध्ये शोककळा पसरली.

घटनेबाबत संबंधित यंत्रणेकडून पुढील कार्यवाही सुरू आहे.

## बेपत्ता इसमाची गळफास घेऊन आत्महत्या

प्रतिनिधी १६ ऑगस्ट



**यवतमाळ :** मारेगाव तालुक्यातील पिसगाव येथील ४२ वर्षीय इसमाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना आज रविवारी (१६ ऑगस्ट) सकाळी उघडकीस आली. शंकर किसन आत्राम असे मृताचे नाव आहे.

शंकर आत्राम हे शनिवारी (१५ ऑगस्ट) पहाटे चार वाजताच्या सुमारास घरातून बेपत्ता झाले होते. कुटुंबीय व नातेवाइकांनी त्यांचा परिसरात शोध घेतला. दरम्यान, रविवारी सकाळी पाहपळ रस्त्यालगतच्या नाल्याजवळ ते गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे. आत्राम यांनी हे टोकाचे पाऊल का उचलले, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

मृत शंकर आत्राम यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे. या घटनेमुळे पिसगाव परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## वनजमिनीच्या वाटणीचा स्वतंत्र सातबारा मिळावा; आदिवासी शेतकऱ्यांचे आमरण उपोषण

### माजी आयुक्त संभाजी सरकुंडे यांचा महसूल प्रशासनावर गंभीर आरोप

प्रतिनिधी १६ ऑगस्ट



**उमरखेड** : भोगवटदार वर्ग-२ व वनजमिनीची पिढ्यान्‌पिढ्या भावाभावांमध्ये झालेली आपसी वाटणी महसूल अभिलेखात नोंदवून प्रत्येक वारसाला स्वतंत्र सातबारा देण्यात यावा, तसेच हक्कसोड व वाटणीची प्रक्रिया पूर्ण करावी, या मागणीसाठी खरबी व बंदीटाकळी येथील आदिवासी शेतकऱ्यांनी १३ ऑगस्टपासून उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

उपोषणस्थळी माजी आदिवासी विकास प्रकल्प आयुक्त संभाजी सरकुंडे यांनी भेट देऊन शेतकऱ्यांच्या मागण्या जाणून घेतल्या. आदिवासींच्या जमिनींचे फेरफार करून सातबारा नावे करण्यास महसूल अधिकारी जाणीवपूर्वक टाळाटाळ करीत असल्याचा आरोप त्यांनी केला. कायद्याचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल होऊ शकतात, असा इशाराही त्यांनी दिला.

वनहक्क कायद्यानुसार आदिवासींना वनपट्टे देण्याची तरतूद असतानाही महसूल विभागाकडून आदिवासींना त्यांच्या अधिकारांबाबत दिशाभूल करणारी उत्तरे दिली जात असल्याचा आरोप सरकुंडे यांनी केला. वनपट्टे मिळालेल्या गैरआदिवासींचे फेरफार करण्यात आले; मात्र आदिवासींच्या वाटणीपत्रांची नोंद करण्यात आलेली नाही, असा दावा त्यांनी केला.

**प्रशासनाच्या भूमिकेवर नाराजी** : दोन दिवसांपासून सुरू असलेल्या उपोषणाची प्रशासनाने दखल घेतली नसल्याबद्दल सरकुंडे यांनी नाराजी व्यक्त केली. आदिवासी शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करून त्यांच्यावर अन्याय होत असल्याचा आरोप त्यांनी केला. यावेळी तालुका काँग्रेसचे माजी अध्यक्ष दत्तराव शिंदे, माजी नायब तहसीलदार उत्तम पांडे, खरबीचे सरपंच सदानंद पांडे तसेच उपोषणकर्ते विलास आंबोरे, गणपत बोंबले, लक्ष्मण हराळ, बालाजी राजने आणि संजय ढोले उपस्थित होते.

## आर्णी पत्रकार संघाची नवीन कार्यकारिणी गठीत

प्रतिनिधी १६ ऑगस्ट



**आर्णी** : येथील शासकीय विश्रामगृहात १५ ऑगस्ट रोजी आर्णी पत्रकार संघाची नवीन कार्यकारिणी गठीत करण्यात आली.

अध्यक्षपदी आबिद फानन, उपाध्यक्षपदी मनोज माघाडे, सचिवपदी जाकीर सोलंकी, कार्याध्यक्षपदी गणेश एकंडवार, तर कोषाध्यक्षपदी परवेज बेग मिर्झा यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

पत्रकारांच्या विविध प्रश्नांसोबतच सामाजिक आणि जनहिताच्या विषयांना प्रभावीपणे वाचा फोडण्यासाठी संघाच्या माध्यमातून कार्य करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

नवीन कार्यकारिणीच्या निवडीनंतर सामाजिक कार्यकर्ते राजेश श्रीवास यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

यावेळी अध्यक्ष आबिद फानन, उपाध्यक्ष मनोज माघाडे, सचिव जाकीर सोलंकी, कार्याध्यक्ष गणेश एकंडवार, कोषाध्यक्ष परवेज बेग मिर्झा यांच्यासह पत्रकार रंजना आडे, पूजा ढाले, बबिता शिवणकर, जफर पठाण, गणेश धनोडे, पुनीत मजेठीया, सनी आडे, किशोर पवार, चंदन राठोड, राजू राठोड, फयाज पठाण, राहुल वानखडे व पूजा शिंदे उपस्थित होते.

# रासायनिक अन्नातून स्वातंत्र्य मिळवण्याची वेळ : पालकमंत्री

### रानभाज्यांमध्ये आरोग्याचा ठेवा; रानभाजी महोत्सवाचे उद्‌घाटन

प्रतिनिधी १६ ऑगस्ट



**यवतमाळ** : देशाला स्वातंत्र्य मिळाले, आता रासायनिक अन्नातून स्वातंत्र्य मिळवण्याची वेळ आली असून त्यासाठी रानभाज्यांचा आहारात समावेश उपयुक्त ठरेल, असे प्रतिपादन पालकमंत्री संजय राठोड यांनी केले. आरोग्यदायी जीवनासाठी नागरिकांनी दैनंदिन आहारात रानभाज्यांचा वापर वाढवावा, असे आवाहनही त्यांनी केले.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी व आत्मा यांच्या संयुक्त विद्यमाने वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन केंद्र येथे जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवाचे उद्घाटन पालकमंत्री राठोड यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हाधिकारी विकास मीना, पोलीस अधीक्षक कुमार चिंता, मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, मुख्य वनसंरक्षक किशोर मानकर, उपवनसंरक्षक नवनीत मिश्रा, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोज ढगे, कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख दीपक कच्छवे, माविमचे जिल्हा समन्वयक सुनील सोसे, पशुसंवर्धन उपायुक्त मंगेश काळे यांच्यासह शेतकरी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महोत्सवातील शेतकरी व महिला बचत गटांच्या स्टॉलला भेट देऊन पालकमंत्र्यांनी विविध रानभाज्यांची माहिती घेतली आणि खरेदी केली.

यावेळी जिल्हाधिकारी विकास मीना यांनी कृषी क्षेत्राच्या विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचे सांगितले. शेतकऱ्यांनी महाविस्तार ॲपचा वापर करून कृषीविषयक माहिती घ्यावी, तसेच रानभाज्यांची खरेदी करून शेतकऱ्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. मुख्य वनसंरक्षक किशोर मानकर यांनीही रानभाज्यांचे महत्त्व विशद केले. कृषी विभागाच्या फार्मर गृप लिग स्पर्धेतील विजेते तसेच कृषी क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या शेतकऱ्यांचा पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

प्रास्ताविक जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोज ढगे यांनी केले. सूत्रसंचालन जितेंद्र सातपुते यांनी केले, तर आत्माचे प्रकल्प उपसंचालक व्यंकट कुंटावार यांनी आभार मानले.

■ **'रानभाजी ॲग्रो-टुरिझम'चा उपक्रम :** रानभाज्या हा निसर्गाने दिलेला आरोग्याचा ठेवा असून, आधुनिक पिढी फास्ट फूडच्या आहारी जात असताना पारंपरिक आणि पौष्टिक आहाराची ओळख करून देणे गरजेचे आहे. रानभाज्यांच्या विविध प्रजातींचे संवर्धन आणि जनजागृतीसाठी जिल्ह्यात 'रानभाजी ॲग्रो-टुरिझम' उपक्रम राबविण्याच्या सूचना राठोड यांनी दिल्या. पुढील काळात तीन दिवसीय रानभाजी महोत्सव आयोजित करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी पुसद जि. यवतमाळ यांचे कार्यालय, पुसद**

### जाहिर नोटीस

एम.आर.सी. ८१/398/२०२६
तहसिल कार्यालय, पुसद
दिनांक 13/08/2026

**आवेदक** :- श्री.सौ./ उल्हास रामधन चव्हाण रा. पारध ता. पुसद जि. यवतमाळ
**अनावेदक** :- मुख्याधिकारी नगर परिषद, पुसद सचिव, ग्राम पंचायत, आडगाव ता. पुसद जि. यवतमाळ

ज्याअर्थी अर्जदार नामे श्री. सौ. उल्हास रामधन चव्हाण पुसद जि. यवतमाळ यांनी त्यांचे भाची नामे श्री/सौ./श्रीमती ख़ुशी सुभाष चव्हाण रा. पारध यांच्या जन्माची नोंद न्यायालयात जन्म / मृत्यू नोंदणी कायद्याचे कलम १३ (३) प्रमाणे दिनांक 31/10/2011 रोजी त्यांच्या जन्म त्यांचे राहत्या घरी मौजा आडगाव ता. पुसद जि. यवतमाळ येथे झाला आहे. या बाबत यांच्या जन्माची नोद मुख्याधिकारी नगर परिषद, पुसद सचिव, ग्रामपंचायत आडगाव पंचायत समिती पुसद यांना घेण्याकरीता आदेश देण्यात यावा याकरीता दि. 13/08/2026 रोजी अर्ज या कार्यालयास प्राप्त झाले आहे. या करीता एम.आर.सी. ८१/ 398 /२०२६ तहसिल कार्यालय, पुसद च्या बतीने मुख्याधिकारी नगर परिषद, पुसद / सचिव, ग्रामपंचायत आडगाव यांना पत्र देण्यात येत आहे. ज्याअर्थी सर्वत्र जनतेस या जाहीर नोटीसब्दारे कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार नामे, श्री. उल्हास रामधन चव्हाण रा. पारध स्वतः आई/ मुलगा/ मुलगी / वडील / भाऊ/बहिण/पुतण्या/आजोबा नामे श्री. सौ. खुशी सुभाष चव्हाण रा आडगाव ता. पुसद यांच्या जन्माची नोंदणी बाचत कोणाचाही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असेल तर त्यांनी हि जाहिर नोटीस प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या कार्यालयात आपण स्वतः हजर अगर आपले वकिला मार्फत हजर राहुन आपली हरकत अथवा आक्षेप लेखी स्वरुपात नोंदवावा, अन्यथा कोणालाही काहीही सांगवयाचे नाही असे गृहीत धरून सदरहु अर्जदाराचा अर्ज निकाली काढण्यात येईल यांची नोंद घ्यावी. आज दिनांक 13/08/2026 रोजी माझ्या सहीने व शिक्यानिशी दिली आहे.

**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, पुसद**

# विकसित भारताच्या निर्मितीसाठी युवकांनी पुढे यावे - आ. प्रविण पोटे पाटील

## पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा





प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**अमरावती :** देशभक्तीच्या उत्साहपूर्ण वातावरणात पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपमध्ये ८० वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात आणि दिमाखात साजरा करण्यात आला. तिरंग्याच्या रंगांनी सजलेल्या संपूर्ण कॅम्पसमध्ये स्वातंत्र्य दिनाचा उत्साह पाहायला मिळाला. संस्थेचे अध्यक्ष आमदार प्रविण पोटे पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष श्रेयशदादा पोटे पाटील, एड. प्रविण मोहोड, कपिल आंडे, प्रकाश पुंड, सचिन वानखडे यांच्यासह संस्थेतील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, उपप्राचार्य, डीन, विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आ. प्रविण पोटे पाटील यांनी तरुण पिढीने राष्ट्रभक्ती, कर्तव्यनिष्ठा, शिस्त आणि राष्ट्रीय एकात्मतेची मूल्ये आत्मसात करण्याचे आवाहन केले. "स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाचे स्मरण ठेवून अमली पदार्थमुक्त भारत निर्माण करण्यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा. नवनवीन तंत्रज्ञान आणि कौशल्याच्या माध्यमातून देशाच्या प्रगतीत योगदान देत विकसित भारताच्या निर्मितीसाठी युवकांनी पुढे यावे," असे आवाहन त्यांनी केले. यानंतर पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, नृत्य, भाषणे तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. विद्यार्थ्यांच्या कलाविष्कारातून स्वातंत्र्य संग्रामातील क्रांतिकारकांचे शौर्य, त्याग आणि बलिदानाला अभिवादन करण्यात आले. विविधतेत एकता, राष्ट्रप्रेम आणि देशभक्तीचा संदेश या सादरीकरणातून प्रभावीपणे देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या विविध कलाविष्कारांना उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. त्यामुळे संपूर्ण परिसरात देशभक्तीचा उत्साह आणि जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी देशाच्या प्रगतीसाठी आपापल्या क्षेत्रातून योगदान देण्याची शपथ घेतली. 'वंदे मातरम्!' आणि 'जय हिंद!'च्या घोषणांनी स्वातंत्र्य दिनाचा उत्सव देशभक्तीपूर्ण वातावरणात उत्साहात संपन्न झाला.

# जलसंधारण, शेतकऱ्यांच्या मदतीवर भर - दादाजी भुसे

## स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा




प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**अमरावती:** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेत ३०८ कोटी रुपयांची शेतकऱ्यांना मदत करण्यात आली. त्यासोबतच जलसंधारणासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या आहे. येत्या काळातही जलसंधारण आणि शेतकऱ्यांना मदतीवर भर देण्यात येणार असल्याचे प्रतिपादन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केले.

स्वातंत्र्य दिनाच्या ७९ व्या वर्धापन दिनानिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात ध्वजवंदनाचा मुख्य कार्यक्रम पार पडला. यावेळी विभागीय आयुक्त नयना गुंडे, विशेष पोलिस महानिरीक्षक डॉ. महेश पाटील, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, पोलिस आयुक्त राकेश ओला, जिल्हा पोलिस अधीक्षक निकेतन कदम आदी उपस्थित होते.

मंत्री . भुसे यांनी, जिल्ह्यात पावसाचे प्रमाण कमी झाल्याने पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी 'जलसंधारण अभियान' राबवले जाणार आहे. तसेच, २१ ऑगस्ट रोजी माजी मुख्यमंत्री सुधाकरराव त्यासोबतच काही भागातील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीसाठी मदत देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना मदत व्हावी, म्हणून कर्जमुक्ती झालेल्या शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटप करण्यात येत आहे.

शिक्षण क्षेत्रातही धोरणात्मक निर्णय घेण्यात आले आहे. शाळांमध्ये राष्ट्रगीतानंतर 'गर्जा महाराष्ट्र माझा' हे राज्यगीत अनिवार्य करण्यात आले आहे. शिक्षण क्षेत्रात मनुष्यबळ उपलब्ध व्हावे, यासाठी केंद्रप्रमुख पदांची भरती करण्यात आली आहे, तसेच पवित्र पोर्टलद्वारे ३० हजार शिक्षक भरती प्रक्रिया सुरू आहे. २६ ऑफ रेकॉर्ड'मध्ये नोंद झाली असल्याचे सांगितले.

जिल्ह्यात पायाभूत सुविधा आणि ग्राम विकासासाठी जिल्हा नियोजनमधून निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. प्रामुख्याने पांदण रस्त्यांसाठी निधी देण्यात आला असून यामुळे शेतकऱ्यांचे वहीवाटीचे रस्ते उपलब्ध करून होणार आहे. चिखलदरा हे परिपूर्ण पर्यटनस्थळ म्हणून विकसित करण्यासाठी निधी देण्यात येत आहे. येथील स्कायवॉकचे वेगाने पूर्ण करण्यात येत आहे. जिल्ह्याच्या विकासात योगदान देणारे अमरावती विमानतळ विस्तारीकरण, नाईट लँडिंग सुविधा आणि पायलट प्रशिक्षण केंद्र उभारणीचे काम वेगाने सुरू आहे. तसेच वस्त्रोद्योग विकासासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे सांगितले.

यावेळी विशेष पोलिस महानिरीक्षक डॉ. महेश पाटील, उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार, विधी अधिकारी नरेंद्र बोहरा, पोलिस उपअधिक्षक तयुब युनुस मुजावर, नागरी हक्क संरक्षण च्या पोलिस अधीक्षक अनिता पाटील, पोलिस निरीक्षक अशोक लांडे, सहायक पोलिस उपनिरीक्षक अनिल काळे, पोलिस हवालदार प्रशांत भटकर, त्र्यंबक मनोहर, राजेश पांडे, प्रभाकर बोदडे, हेड कॉन्स्टेबल निलेश अंबर्ते, दिपमाला साळुंखे, अतुल कडू, प्रदिप बद्रे, मिलींद बेलसरे, हरीना नेत्रदान समितीचे मनोज राठी, राजेंद्र वर्मा, रामप्रकाश मिश्रा, मुकेश लोहिया, शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळविल्याबद्दल सारांश सारडा, गार्गी कुऱ्हाडे, दिया पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जलसंधारण, व्यसनमुक्ती, पॉश कायदा, साक्षरतेची शपथ घेण्यात आली. तसेच जलसंधारणाच्या लोगोचे अनावरण करण्यात आले.

# राज्य माहिती आयोगात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**अमरावती:**भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त राज्य माहिती आयोगाच्या अमरावती येथील कार्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. अमरावती येथील राज्य माहिती आयुक्त रविंद्र ठाकरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राज्य माहिती आयोगाचे उपसचिव . देविसिंग डाबेराव, मधुसुदन देशमुख,आशिष मन्वर यांच्यासह आयोगातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीताचे सामूहिक गायन करण्यात आले. उपस्थितांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या थोर स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन केले. स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर कार्यालय परिसरात उत्साहाचे आणि देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले होते.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात असंख्य स्वातंत्र्यसैनिकांनी केलेला त्याग, संघर्ष आणि बलिदान यांचे स्मरण करून देणारा हा दिवस आहे. स्वातंत्र्याबरोबरच देशाची लोकशाही व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी संविधानिक मूल्यांचे जतन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांच्या आधारावर देशाची लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी सर्वांनी योगदान देण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली.

माहितीचा अधिकार हा नागरिकांना शासनाच्या कामकाजाबाबत माहिती मिळवून देणारा तसेच प्रशासनात पारदर्शकता व उत्तरदायित्व वाढविणारा महत्त्वपूर्ण कायदा आहे. नागरिकांच्या माहितीच्या अधिकाराचे संरक्षण आणि लोकाभिमुख प्रशासनाला चालना देण्यामध्ये राज्य माहिती आयोगाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. या अनुषंगाने आयोगातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नागरिकांना अधिक प्रभावी, पारदर्शक आणि उत्तरदायी सेवा देण्यासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी देशाची एकता, अखंडता आणि लोकशाही मूल्ये जपण्यासोबतच आपल्या शासकीय कर्तव्यांचे प्रामाणिकपणे पालन करण्याचा संकल्प केला. राष्ट्रप्रेम, संविधानिक मूल्ये आणि देशसेवेची भावना वृद्धिंगत करण्याचा संदेश देत कार्यक्रमाची सांगता झाली.

# पालकांनी पाल्यांच्या शिक्षणाकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे - शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

## जिल्हा परिषद कन्या शाळेत देशभक्ती गीतांवर विद्यार्थिनीं सादर केल्या उत्कृष्ट कवायती

प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**अमरावती:** विद्यार्थी भविष्यातील देशाचे सुजान नागरीक आहेत.दैनंदिन जीवनात इतर गोष्टींमध्ये तडजोड करा मात्र, पाल्यांच्या शिक्षणासाठी कोणतीही तडजोड न करता पालकांनी त्यांच्या शिक्षणाकडे जाणीवपूर्वक लक्ष देण्याचे आवाहन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी आज येथे केले. जिल्हा परिषद कन्या शाळेला सुविधांसाठी शासनाच्यावतीने पूर्ण सहकार्य करण्यात येईल असे सांगत प्रत्येक वर्गात गुणानुक्रमे येणाऱ्या पहिल्या तीन विद्यार्थ्यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून १ लाख रुपयांचा निधीही त्यांनी शाळेसाठी जाहीर केला.

स्वातंत्र्य दिनाच्या मुख्य शासकीय कार्यक्रमानंतर शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी शहरातील जिल्हा परिषद कन्या शाळेला भेट दिली यावेळी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. जिल्हाधिकारी आशिष येरेकर, जिल्हा परिषदेचे अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) सिद्धेश्वर काळुसे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रिया देशमुख, जिल्हा परिषद कन्या शाळेचे मुख्याध्यापक बाळकृष्ण आंधळे आदी यावेळी उपस्थित होते. मंत्री भुसे म्हणाले, या शाळेत गुणात्मक शिक्षणासह मुलींना स्वसंरक्षणाचे धडे दिले जातात व सैनिकी प्रशिक्षणही दिले जात असल्याची बाब कौतुकास्पद आहे. मुलींच्या कला व क्रीडा गुणांनाही प्राधान्य देण्यात येत आहे ही समाधानाची बाब आहे. शाळा व शाळेचा परिसर स्वच्छ व सुंदर आहे. यासोबतच शाळेतील अन्य आवश्यक सुविधांसाठी शासनातर्फे पूर्ण मदत करण्यात येईल. शाळांमधून चांगले संस्कार व गुणात्मक शिक्षण मिळते व यातूनच देशाचे सुजान नागरीक घडतात म्हणून पालकांनी कोणतीही तडजोड न करता पाल्यांना शिकवावे असे त्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांनीही चांगला अभ्यास करून आई-वडिल, गुरुजन,कुटुंब,गाव,राज्य व देशाचे नाव उज्वल करावे, असा संदेशही त्यांनी दिला. कन्या शाळेतील गुणवंत विद्यार्थीना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून १ लाख रुपयांचा निधी देण्यात येणार असल्याचे यावेळी सांगितले.

# स्वत: च्या मालकी हक्काच्या जागेसाठी न्याय मिळण्याकरीता जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती येथे उपोषण

## मोर्शी येथील नरेंद्र वामनराव गोहाड यांचे YSP मार्गदर्शक सुनिल राणा व YSP जिल्हाअध्यक्ष प्रकाश साबळे यांनी सोडविले उपोषण



प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**अमरावती:** स्वतःच्या मालकी हक्काच्या जागेसाठी न्याय मिळावा, या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे उपोषणास बसलेले मोर्शी येथील नरेंद्र वामनराव गोहाड यांचे उपोषण YSPचे मार्गदर्शक सुनील राणा व YSP जिल्हाध्यक्ष प्रकाश साबळे यांच्या पुढाकाराने सोडविण्यात आले.

गोहाड यांनी मोर्शी नगर परिषद येथे झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने योग्य चौकशी करून न्याय मिळावा, तसेच त्यांच्या मालकी हक्काच्या जागेसंदर्भातील प्रश्न तातडीने मार्गी लावावा, अशी मागणी केली होती. याबाबत मोर्शी नगर परिषद कार्यालयाकडून संबंधित तक्रारीची चौकशी करण्यात आली.

प्रकरणातील विविध मुद्द्यांवर नगर परिषद प्रशासनाकडून कार्यवाही करण्यात येत असल्याची माहिती देण्यात आली. तसेच संबंधित तक्रारींचे निराकरण करण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न करण्यात येत असल्याने नरेंद्र गोहाड यांना उपोषण मागे घेण्यास समजावून सांगण्यात आले.

यावेळी YSP मार्गदर्शक सुनील राणा आणि जिल्हाध्यक्ष प्रकाश साबळे यांनी पुढाकार घेत नरेंद्र गोहाड यांच्याशी चर्चा करून त्यांचा प्रश्न प्रशासनाच्या माध्यमातून मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर गोहाड यांनी आपले उपोषण सोडले.

सामान्य नागरिकांच्या न्याय्य हक्कांसाठी YSP सदैव त्यांच्या पाठीशी राहील, अशी भूमिका यावेळी सुनील राणा व प्रकाश साबळे यांनी व्यक्त केली.

# अमरावती पोलीस आयुक्तालयात स्वातंत्र्यदिन उत्साहात

## उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांचा सन्मान



प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**अमरावती:** अमरावती शहरातील पोलीस आयुक्तालयात आज १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी राष्ट्रध्वज फडकावून राष्ट्रध्वजाला सलामी देण्यात आली. देशभक्तीपर वातावरणात झालेल्या या कार्यक्रमाला पोलीस अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांची उपस्थिती होती.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात पोलीस विभागात उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. दीर्घकाळ निष्ठेने सेवा बजावणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना उत्कृष्ट सेवा पदक तसेच विशेष सेवा पदक देऊन गौरविण्यात आले. तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या नागरिकांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. आपल्या कर्तव्याप्रती निष्ठा, धैर्य, कौशल्य आणि उत्कृष्ट सेवेसाठी गौरविण्यात आलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचे उपस्थितांनी अभिनंदन केले. स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमातून पोलीस दलातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करण्यासोबतच समाजासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या नागरिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने उत्कृष्ट सेवा, अतिउत्कृष्ट सेवा व विशेष सेवा पदकांनी गौरविण्यात येणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये पोलीस उपआयुक्त परी. २ शाम धुमे, पोलीस उपआयुक्त परी. १ यशवंत साळुंके, पोलीस निरीक्षक सीमा दाताळकर, पोलीस निरीक्षक रवि राजुलवार, पोलीस निरीक्षक निलेश गावंडे, पोलीस निरीक्षक बाबाराव अवचार, पोलीस निरीक्षक दिप्ती ब्राम्हणे, रापोनि. श्रीपतराव गुलसुंदरे, स.पो.नि. इमरान नाईकवाडे, पोउपनि. विलास जामनेरकर, पोउपनि. विजय शेडकरकर, पोउपनि. ज्योती देवकते, सपोउपनिरी/९८४ प्रविण बुंदेले, सपोउपनिरी, अशोक वाटाणे, सपोउपनि, संजय पाटिंगे, पोहवा, नंदकिशोर अंबुलकर, पोहवा, निखिल माहुरे, पोहवा/ प्रविण आखरे, सपोउपनि झाकीर हुसैन, सपोउपनि/STO राजू जायभाये आणि पोहवावि. यं. चा. संजय केतकर यांचा समावेश आहे.

# उणे 45 अंश तापमानात ऑक्सिजन सिलिंडर लावून सैनिकांचे देशरक्षण

## येवद्यात नायक रविकांत कोल्हे यांनी मांडली सीमेवरील थरारक गाथा...



प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**अमरावती:** दर्यापूर तालुक्यातील येवदा येथे स्वातंत्र्यदिनानिमित्त कार्यक्रमात उपस्थितांचे डोळे पानावनारा एक अत्यंत भावूक प्रसंग पाहायला मिळाला. भारतीय सैन्यातील वीर जवान नायक रविकांत कोल्हे यांनी सीमेवर सेवा बजावतानाचा आपला अत्यंत थरारक आणि कठीण अनुभव उपस्थितांसमोर मांडला. सियाचीनसारख्या भागात उणे ४५ अंश सेल्सिअस तापमान आणि सतत होणाऱ्या तुफान बर्फवृष्टीत, पाठीवर ऑक्सिजन सिलिंडर बांधून अहोरात्र देशरक्षण कसे करावे लागते, याची थरारक गाथा त्यांनी विषद केली. हे ऐकून खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्यासह संपूर्ण येवदा ग्रामस्थ स्तब्ध आणि भावूक झाले. या ऐतिहासिक सोहळ्यात सीमेवर तैनात असलेल्या आजी-माजी सैनिकांचा विशेष सत्कार करण्यात आला. खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी या वेळी बोलताना, जवानांच्या या असीम त्यागातून तरुण पिढीने राष्ट्रप्रेमाची प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले.

# भारताची एकता, अखंडता, सार्वभौमत्व आणि संविधानाचा सन्मान सदैव जपू

## जनसंपर्क कार्यालयात ८० व्या स्वातंत्रदिनानिमित्य आमदार सुलभा खोडके यांच्या हस्ते ध्वजारोहण



प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**अमरावती :** भारत हा विविध धर्म, भाषा, संस्कृती आणि परंपरांचा संगम आहे. अनेकतेत एकता हीच आपल्या देशाची खरी ओळख आहे. आजच्या काळात समाजात सौहार्द, बंधुभाव आणि परस्पर आदर जपणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. आपण सर्वांनी एकजुटीने देशाच्या प्रगतीसाठी योगदान दिले, तर भारत जगातील सर्वात सक्षम आणि विकसित राष्ट्रांपैकी एक बनेल. आज या पवित्र स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी भारताची एकता, अखंडता, सार्वभौमत्व आणि संविधानाचा सन्मान सदैव जपण्यासाठी शपथबद्ध व्हावे, असे आवाहन आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी केले.

आज शनिवार दिनांक १५ ऑगस्ट २०२६ रोजी भारताच्या ८० व्या स्वातंत्रदिन सोहळा आमदार - सौ.सुलभाताई खोडके यांच्या जनसंपर्क कार्यालय येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आमदार महोदयांच्या हस्ते भारतीय तिरंग्याचे ध्वजारोहण करून राष्ट्रध्वजाला मानवंदना अर्पण करण्यात आली. तसेच सर्व उपस्थितांनी सामूहिक राष्ट्रगान करून देशाप्रतीची कृतज्ञता व्यक्त करून स्वातंत्र्यलढ्यातील थोर महापुरुष, क्रांतिकारी व हुतात्म्यांचे स्मरण केले. यावेळी उपस्थितांना शुभेच्छा देतांना आमदार - सौ.सुलभाताई खोडके म्हणाल्या कि, स्वातंत्र्य म्हणजे केवळ परकीय सत्तेतून मुक्त होणे नव्हे, तर देशप्रेम, राष्ट्रभक्ती, जबाबदारी, शिस्त, कर्तव्य आणि एकात्मता यांचा स्वीकार करणे आहे. आपल्या संविधानाने प्रत्येक नागरिकाला समान हक्क दिले आहेत, तसेच देशाप्रती काही महत्त्वाची कर्तव्येही दिली आहेत. या कर्तव्यांचे प्रामाणिकपणे पालन करणे हीच आपल्या स्वातंत्र्यसैनिकांना खरी आदरांजली ठरेल. राष्ट्रीय एकता आणि अखंडता हीच आपल्या देशाची सर्वात मोठी ताकद असल्याचे सुद्धा आमदार महोदयांनी अधोरेखित केले. कार्यक्रमाला विधान परिषद आमदार - संजय खोडके, शोध प्रतिष्ठानचे अध्यक्ष - यश खोडके, मनपा स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष- प्रशांत डवरे, माजी महापौर - अँड.किशोर शेळके, सौ. रीनाताई नंदा, मनपा महिला बालकल्याण सभापती - ममता संदीप आवारे, माजी नगरसेवक यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस परिवार, सर्व सहकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शहरातील दुभाजकामधे टर्मिनिया प्रजातीच्या वृक्ष लागवड अभियानाचा शुभारंभ

अमरावती शहराला स्वच्छ, सुंदर व हरित तसेच प्रदूषण मुक्त व पर्यावरण पूरक बनविण्यासाठी आ.सौ. सुलभाताई खोडके यांच्या संकल्पनेतून "ग्रीन अमरावती"अंतर्गत वृक्ष लागवड अभियान राबविण्यात येत आहे. या उपक्रमामध्ये अमरावती शहरातील सर्व दुभाजकांमध्ये हिरवळ सजविण्याला घेऊन टर्मिनिया प्रजातीच्या वृक्षाची लागवड करण्यात येत आहे. आज शनिवारी स्वातंत्र्यदिनाच्या पर्वावर आमदार - सौ. सुलभाताई खोडके यांच्या हस्ते स्थानिक रेल्वे स्टेशन चौकातील दुभाजकावर टर्मिनिया प्रजातीच्या वृक्षाची लागवड करून अभियानाचा शुभारंभ करण्यात आला.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
रविवार, दि.१६ ऑगस्ट२०२६ http://epaper.citynewssuperfast.com

**१५ ते २४ ऑगस्टदरम्यान जनजागृती मोहीम**

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)

# सोशल मीडियावर स्वच्छतेचा गजर; गावात घनकचऱ्याचा कहर!

## *साहेब, सोशल मीडिया पोस्टसोबत गावातील घनकचरा व्यवस्थापनाची अवस्थाही पाहा

● प्रभाकर नाईकवाडे @ केनवड ●

वाशिम जिल्हा परिषदेचे सीईओ अर्पित चव्हाण यांचा काल सोशल मीडियावर एक व्हिडिओ व्हायरल झाला. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनाचे धडे आणि जनजागृतीचा संदेश देत १५ ते २४ ऑगस्टदरम्यान सोशल मीडियाच्या माध्यमातून जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. सोशल मीडियावर स्वच्छतेचे संदेश, घनकचरा व्यवस्थापनाचे धडे आणि जनजागृतीचा गजर सुरू केला आहे; मात्र गावागावातील प्रत्यक्ष परिस्थिती काय आहे, याकडेही प्रशासनाने तितक्याच गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.



१५ ते २४ ऑगस्टदरम्यान सोशल मीडियाच्या माध्यमातून घनकचरा व्यवस्थापनाबाबत जनजागृती मोहीम राबविली जात असताना, या मोहिमेची खरी कसोटी सोशल मीडियावर नव्हे, तर गावातील रस्ते, गल्ली-बोळ आणि कचरा संकलन केंद्रांवर होणार आहे.घनकचरा व्यवस्थापनासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये कामे झाली आहेत का? त्यासाठी खर्च झालेला निधी योग्य पद्धतीने वापरला गेला का? कामे चांगल्या दर्जाची झाली आहेत का? आजच्या परिस्थितीत ही कामे प्रत्यक्ष जागेवर अस्तित्वात आहेत का? याची पाहणी होणे तितकेच गरजेचे आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून जनजागृती करणे चांगले; मात्र जनजागृती प्रत्यक्षात आणायची असेल तर सीईओ साहेबांनी गावागावात उतरून घनकचरा व्यवस्थापनाच्या कामांची पाहणी करावी; तरच जनजागृती खऱ्या अर्थाने सार्थ ठरेल.घनकचरा वर्गीकरण, ओला-सुका कचरा वेगळा करणे, नियमित कचरा संकलन, योग्य विल्हेवाट आणि गाव स्वच्छ ठेवण्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करणे निश्चितच आवश्यक आहे. मात्र, ज्या गावांमध्ये घनकचरा व्यवस्थापनासाठी कामे झाली आहेत, त्या कामांची प्रत्यक्ष अवस्था काय आहे? त्यांचा नागरिकांना किती फायदा होत आहे? कचरा संकलन नियमित होते का? वर्गीकरण प्रत्यक्षात होते का? याचीही प्रशासनाने पाहणी करणे गरजेचे आहे.घनकचरा व्यवस्थापनासाठी निधी खर्च करून सुविधा उभारल्या जात असतील, तर त्या सुविधा प्रत्यक्ष वापरात आहेत की केवळ कागदोपत्री आणि फोटोपुरत्या मर्यादित आहेत, याची तपासणी झाली पाहिजे. गाव स्वच्छतेचे संदेश देण्यापूर्वी गावातील घनकचऱ्याची वस्तुस्थिती प्रशासनाच्या नजरेतून जाणे आवश्यक आहे.

### सीईओ साहेब, आता गावात उतरून पाहणीची वेळ!

घनकचरा व्यवस्थापनाबाबत नागरिकांना सूचना देण्यासोबतच गावातील प्रत्यक्ष परिस्थिती तपासा, झालेल्या कामांची पाहणी करा आणि त्रुटी आढळल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करा, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. जनजागृतीचा गजर सोशल मीडियावर असू द्या; पण स्वच्छतेचा परिणाम गावाच्या रस्त्यावर आणि प्रत्येक घराच्या दारात दिसला पाहिजे.

### पोस्टपेक्षा प्रत्यक्ष पाहणी महत्त्वाची...

१५ ते २४ ऑगस्टदरम्यान सोशल मीडियावर जनजागृती मोहीम राबविणे चांगले पाऊल आहे; मात्र त्यासोबतच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गावागावात झालेल्या घनकचरा व्यवस्थापनाच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. कारण सोशल मीडियावरील पोस्ट काही क्षणांत गायब होते; पण गावातील कचऱ्याचा ढिगारा नागरिकांना दररोज दिसतो. त्यामुळे जनजागृतीच्या संदेशांसोबत प्रत्यक्ष अंमलबजावणी, कामांची गुणवत्ता आणि निधीचा योग्य वापर यावरही प्रशासनाने लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. 'सोशल मीडियावर स्वच्छतेचा गजर' तेव्हाच सार्थ ठरेल, जेव्हा त्याचा परिणाम 'गाव स्वच्छ, कचरामुक्त' या प्रत्यक्ष वास्तवात दिसून येईल.

## थोडक्यात

### मंगरुळपीर येथे जनसंपर्क कार्यालयाचे थाटात उद्घाटन



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा पवार गट)च्या वतीने मंगरुळपीर शहरात उभारण्यात आलेल्या जनसंपर्क कार्यालयाचा उद्घाटन सोहळा शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी उत्साहात संपन्न झाला.

नगरपरिषद मंगरुळपीरचे नगराध्यक्ष मा. श्री. अशोकभाऊ महादेवराव परळीकर यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन कॅबिनेट मंत्री तथा कृषिमंत्री आणि वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री मा. श्री. दत्तामामा भरणे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.सोनाई कॉम्प्लेक्स, महात्मा ज्योतिबा फुले चौक, मंगरुळपीर येथे झालेल्या या उद्घाटन सोहळ्यास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नगरपरिषद सदस्य तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी उपस्थित मान्यवरांनी जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्या व विविध प्रश्नांना प्राधान्य देऊन त्यांचा पाठपुरावा करण्याची अपेक्षा व्यक्त केली. नागरिक आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील संवाद अधिक प्रभावी होण्यासाठी हे कार्यालय महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.शहरातील विकासकामांना गती देणे, नागरिकांच्या समस्या जाणून घेणे आणि त्यावर प्रभावीपणे पाठपुरावा करणे यासाठी जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न केले जातील, असे यावेळी सांगण्यात आले.उद्घाटन सोहळ्याला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल मा. . अशोकभाऊ महादेवराव परळीकर यांनी उपस्थित मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांचे आभार मानले.

# मेडशी लाकूड डेपोची सुरक्षा वाऱ्यावर; फक्त वसुलीवर नजर, रेंजर गैरहजर!

## विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह; लाखो रुपयांच्या वनसंपदेच्या देखभालीकडे दुर्लक्ष

● सिटी न्युज ब्युरो @ मेडशी ●





मेडशी प्रतिनिध /मालेगाव तालुक्यातील मेडशी येथील हनुमानवाडीला लागून असलेल्या वन विभागाच्या लाकूड डेपोच्या कारभाराबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. डेपोमध्ये वन विभागाच्या कारवाईत जप्त केलेली वाहने, विविध प्रकारचे सागवान व इतर लाकूड तसेच वनसंपदेशी संबंधित साहित्य मोठ्या प्रमाणात ठेवण्यात आले असून, त्याच्या सुरक्षिततेकडे आणि देखभालीकडे पुरेसे लक्ष दिले जात नसल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, डेपोच्या जबाबदारीवर असलेले रेंजर अधिकारी अनेक दिवसांपासून नियमितपणे उपस्थित राहत नसल्याचेही सांगितले जात आहे. लाकूड डेपोतील मालमत्ता, जप्त लाकूड, वाहने आणि इतर साहित्याची निगराणी करण्याची जबाबदारी संबंधित वन अधिकाऱ्यांवर असते. मात्र, स्थानिकांच्या म्हणण्यानुसार संबंधित रेंजर अनेक दिवस डेपोमध्ये उपस्थित राहत नाहीत. पंधरा ते वीस दिवसांच्या कालावधीत एखादी चक्कर होत असल्याचा आरोप असून, उर्वरित कामकाज कागदोपत्रीच सुरू असल्याचा दावा करण्यात येत आहे. जर हा आरोप खरा असेल, तर एवढ्या मोठ्या प्रमाणात वनसंपदा व जप्त साहित्य असलेल्या डेपोच्या सुरक्षेची जबाबदारी नेमकी कोण पार पाडत आहे, असा सवाल उपस्थित होत आहे.

डेपोमध्ये काही खाजगी व्यक्तींकडून काम करून घेतले जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, काही व्यक्ती स्वतःला अधिकारी असल्याचे सांगून नागरिकांशी व्यवहार करीत असल्याची चर्चा परिसरात असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. वन विभागासारख्या संवेदनशील यंत्रणेच्या मालमत्तेच्या ठिकाणी अधिकृत कर्मचारी कोण आणि खाजगी व्यक्तींना कोणत्या अधिकाराने काम देण्यात आले, याची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्पष्ट चौकशी करावी, अशी मागणी जोर धरत आहे. लाकूड डेपो परिसरातील अनेक पथदिवे कित्येक दिवसांपासून बंद असल्याचे सांगण्यात येते. मोठ्या प्रमाणात लाकूड व जप्त वाहने ठेवलेल्या परिसरात रात्रीच्या वेळी पुरेशा प्रकाशाची व्यवस्था नसणे ही गंभीर बाब असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. अंधारामुळे चोरी, अनधिकृत हालचाली किंवा इतर अनुचित प्रकार घडल्यास त्याची जबाबदारी कोणाची, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. वन विभागाने तातडीने पथदिवे सुरू करून संपूर्ण परिसराची सुरक्षा व्यवस्था मजबूत करावी, अशी मागणी होत आहे. डेपोमध्ये कार्यरत कर्मचारी व येणाऱ्या नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची पुरेशी व्यवस्था नसल्याची तक्रारही समोर आली आहे. शासनाच्या निधीतून विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याचे कागदोपत्री दाखवले जात असल्यास, प्रत्यक्षात त्या सुविधा सुरू आहेत का, याची तपासणी करणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.डेपोमध्ये विविध कारवाईत जप्त केलेले तसेच वन विभागाशी संबंधित सागवान आणि इतर जातीचे मोठ्या प्रमाणातील लाकूड ठेवण्यात आले आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने लाकूड पावसाच्या पाण्यामुळे भिजत असून, त्यातील काही लाकूड खराब होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.लाखो रुपयांची शासकीय मालमत्ता योग्य पद्धतीने संरक्षित न केल्यास शासनाचे आर्थिक नुकसान होऊ शकते. त्यामुळे डेपोतील संपूर्ण लाकडाची मोजणी, वर्गीकरण, पंचनामा व सद्यस्थितीचा अहवाल तयार करण्याची गरज असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.वन विभागाच्या विविध कारवायांमध्ये जप्त करण्यात आलेली लहान-मोठी वाहनेही डेपोमध्ये उभी असल्याचे सांगण्यात येते. या वाहनांमधील साहित्य तसेच वाहनांची सद्यस्थितीही बिकट असल्याची तक्रार आहे.जप्त वाहनांची नियमित पाहणी, त्यांची नोंद, सुरक्षितता आणि न्यायालयीन प्रक्रियेपर्यंत त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणेची असते. त्यामुळे या वाहनांची अद्ययावत नोंदवही व प्रत्यक्ष पंचनामा तपासण्याची मागणी होत आहे.

# श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञाचे आयोजन

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



गायत्री सत्संग मंडळ वाशिमद्वारा भागवताचार्य आनंद दायमा यांच्या वाणीतुन श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञाचे आयोजन स्थानिय 'गोकुलधाम' अग्रसेन भवन येथे करण्यात आले आहे. १८ ते २४ ऑगष्ट ह्या दरम्यान रोज दुपारी १२ ते ५ या वेळेत हे कथावाचन होईल. ह्याअंतर्गत १८ ऑगष्ट रोजी नारद व्यास संवाद, गोकर्ण महात्म्य, श्री शुकदेवजी आगमन, १९ ऑगष्ट रोजी मनु-कर्दम चरित्र, ध्रुव व्याख्यान, कपीलोपदेश, शिवचरित्र, २० ऑगष्ट रोजी भरत चरित्र, दधीची चरित्र, नृसिंह अवतार, समुद्रमंथन, २१ ऑगष्ट रोजी श्री वामनावतार, श्रीराम चरित्र, श्रीकृष्ण जन्मोत्सव कथा, २२ ऑगष्ट रोजी श्रीकृष्ण बाललीला, श्री गोवर्धन पुजा, श्रीकृष्ण रुक्मीणी विवाह, २३ ऑगष्ट रोजी द्वारकालीला, सुदामा पुजन तसेच सोमवार, २४ ऑगष्ट रोजी परिक्षीत मोक्ष, उद्धव गीता, दत्त चरित्रचे आयोजन केलेले आहे. २५ ऑगष्ट रोजी गायत्री हवनानंतर १२ ते ३ पर्यत महाप्रसाद वितरण होणार आहे. तरी सर्व भाविकांनी उपरोक्त कथा ज्ञानयज्ञाचा लाभ घ्यावा असे आवाहन गायत्री सत्संग मंडळ, अग्रवाल समाज, सद्गुरु विजयप्रकाशजी दायमा बहुउद्देशिय संस्था, गुरु माँ महिला मंडळाचे वतीने करण्यात आले आहे.

# शिक्षणाची परवड होऊ नये व चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळावे - सुभाषराव ठाकरे

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●




यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय, मंगरुळपीर येथे भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.यावेळी मोतीरामजी ठाकरे शिक्षण प्रसारक मंडळ कासोळाचे अध्यक्ष सुभाषराव ठाकरे हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. स्वातंत्र्यदिनानिमित्त महाविद्यालयाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रध्वजास मानवंदना माजी मंत्री सुभाषराव ठाकरे यांच्या हस्ते देण्यात आली. त्यानंतर राष्ट्रगीत,व राज्यगीत ने वातावरण देशभक्तिमय झाले. यावेळी मंचकावर रमेश नावंदर,नारायणराव बारड, राजकुमार गावंडे,राजू पाटील, प्रकाश महल्ले,डॉ.नवल असावा, चंद्रकांत पाकधने, किशोर पाटील कदम, लईक अहमद, नरेश भगत, अमोल पाटील, यशवंत धोटे, गिरीश बाहेती, विजय भोजने, संकुलातील सर्व शाळा, महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केली. कु. नेहा जटाळे आणि वेदांत गोदुवाले वाय. सी. सी. बी. एस. सी. स्कूल. कु. उन्नती जाधव आणि कु. आराध्य चव्हाण वाय सी इंग्लिश हायस्कूल यांनी देशभक्तिपर गीत, भाषणे व सांस्कृतिक स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवी वारसा पुढे नेत राष्ट्राच्या विकासात प्रत्येकाने आपले योगदान द्यावे, असा संदेश कार्यक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमांचे प्राताविक प्राचार्य डॉ.राहुल सुर्वे सर यांनी केले.तर सूत्र संचालन प्रा. डॉ. अनंत शिंदे, प्रा.डॉ.श्रीकांत रासेकर,डॉ.संजय इंगळे यांनी केले. उत्साहपूर्ण आणि देशभक्तिमय वातावरणात स्वातंत्र्यदिन सोहळ्याची सांगता झाली.

# बांधकाम विभागात भ्रष्टाचाराचे अड्डे, युवकांनीच बुजविले महामार्गावरील खड्डे!

- *मेडशीतील युवकांचा समाजहिताचा आदर्श
- *राष्ट्रीय महामार्गावरील खड्डे स्वखर्चाने बुजविले
- * प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अपघातांचा धोका वाढला
- * स्वातंत्र्य दिनी सरपंच व मित्रमंडळाचा पुढाकार

● सिटी न्युज ब्युरो @ मेडशी ●

अकोला-नांदेड राष्ट्रीय महामार्गावरील मेडशी ते मालेगाव दरम्यानच्या रस्त्यावर पडलेल्या गंभीर स्वरूपाच्या खड्ड्यांमुळे वाहनचालक व नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असताना, प्रशासनाच्या प्रतीक्षेत न राहता मेडशी येथील युवकांनी सामाजिक बांधिलकीचे भान राखत पुढाकार घेतला आहे. मेडशीचे सरपंच शेख जमीरभाई शेख गणीभाई व त्यांच्या मित्रमंडळाने स्वखर्चाने रस्त्यावरील खड्डे सिमेंट-काँक्रीटने बुजविण्याचे काम हाती घेतले आहे. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाचे ग्रामस्थांकडून विशेष कौतुक होत आहे.



अकोला ते नांदेड राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत करण्यात आले. या चौपदरीकरणादरम्यान मेडशी गावासाठी बायपासचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला; मात्र गावातून जाणाऱ्या जुन्या मार्गाच्या दुरुस्तीचा प्रश्न अद्याप प्रलंबित राहिला आहे. परिणामी या रस्त्यावर ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात खड्डे निर्माण झाले असून, गेल्या काही काळापासून वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.विशेषतः दुचाकीस्वारांसाठी हे खड्डे अत्यंत धोकादायक ठरत असून, रस्त्यावर वारंवार अपघात घडत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. रात्रीच्या वेळी खड्डे स्पष्टपणे दिसत नसल्याने अपघाताचा धोका अधिकच वाढतो. अनेक वाहनचालकांना या खड्ड्यांमुळे अपघातांना सामोरे जावे लागल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती.

या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी मेडशी ग्रामपंचायतीने वेळोवेळी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदने सादर करून रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली. तथापि, संबंधित यंत्रणांमध्ये या रस्त्याच्या जबाबदारीबाबत स्पष्टता नसल्याने प्रत्यक्ष दुरुस्तीचे काम अद्याप मार्गी लागलेले नाही. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रशासकीय प्रक्रियेत हा रस्ता अडकून पडल्याचे चित्र निर्माण झाले आहे.दरम्यान, रस्त्याची दुरवस्था दिवसेंदिवस वाढत असताना नागरिकांच्या सुरक्षिततेचा विचार करून सरपंच शेख जमीरभाई शेख गणीभाई यांनी आपल्या मित्रमंडळासह पुढाकार घेतला. 'प्रशासनाच्या प्रतीक्षेत नागरिकांचा जीव धोक्यात घालण्यापेक्षा आपण आपल्या परीने रस्ता सुरक्षित करण्यासाठी योगदान देऊ', या भूमिकेतून त्यांनी स्वखर्चाने खड्डे बुजविण्याचा निर्णय घेतला.

या उपक्रमांतर्गत रस्त्यावरील मोठे खड्डे सिमेंट-काँक्रीटच्या साहाय्याने बुजविण्यात येत आहेत. खड्ड्यांची योग्य पद्धतीने दुरुस्ती करून रस्ता वाहनचालकांसाठी अधिक सुरक्षित करण्याचा प्रयत्न केला जात आहे. काँक्रीटच्या कामामुळे दुरुस्ती अधिक टिकाऊ होईल, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे.या सामाजिक उपक्रमात सरपंच शेख जमीरभाई शेख गणीभाई, सामाजिक कार्यकर्ते शेख जावेद शेख अन्सारभाई, प्रसाद प्रदीप पाठक, मनोज बिबे, शेख साबीर शेख गणीभाई यांच्यासह मित्रमंडळातील सदस्यांनी सक्रिय सहभाग घेतला आहे.

# वाशीम जिल्हा परिषदेचे सीईओ साहेब शिक्षकांची रिक्त पदे भरा!

## विद्यार्थ्यांचे भविष्य सावराः उमेश गुंजकरांचे शिक्षणमंत्र्यांना निवेदन

● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●



केनवड जिल्हा परिषद सर्कलमधील शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी रिक्त शिक्षक पदे तातडीने भरण्याची मागणी समाजसेवक तथा शिवसेना सदस्य उमेश केशवराव गुंजकर यांनी शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

आमदार भावनाताई गवळी यांच्या उपस्थितीत हे निवेदन देण्यात आले. केनवड, कळमगव्हाण, पिंपरी सरहद्द, कोयाळ बुद्रुक, कोयाळी खुर्द व नंधाना येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. शिक्षकांच्या कमतरतेमुळे एका शिक्षकावर अनेक वर्गांची जबाबदारी येत असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे रिक्त पदे तातडीने भरावीत तसेच शिक्षक उपलब्ध होईपर्यंत पर्यायी शिक्षकांची व्यवस्था करावी, अशी मागणी गुंजकर यांनी केली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करून शासनाने या प्रश्नाची तातडीने दखल घ्यावी आणि केनवड सर्कलमधील शाळांमध्ये आवश्यक तेवढे शिक्षक उपलब्ध करून द्यावेत, अशी अपेक्षा पालक व ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

# पत्रकारांशी अरेरावी करणाऱ्या 'त्या' पोलीस कर्मचाऱ्यावर कारवाई करा!

## आंदोलनाचा इशारा : उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**मलकापूर:** तिरंगा रॅलीचे वृत्तसंकलन करणाऱ्या पत्रकाराशी अरेरावी करून 'तुला पाहून घेईल' अशी धमकी दिल्याचा आरोप असलेल्या पोलीस कर्मचारी चंद्रकांत कृष्णा शिंदे यांच्यावर तातडीने कायदेशीर कारवाई करावी, अन्यथा मलकापूर पत्रकार संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा पत्रकारांनी दिला आहे. यासंदर्भात मलकापूर पत्रकार संघटनेच्या वतीने उपविभागीय पोलीस अधिकारी, मलकापूर यांना निवेदन देण्यात आले.

१५ ऑगस्ट रोजी शहरात तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीचे वृत्तसंकलन करण्यासाठी पत्रकार दीपक इटणारे घटनास्थळी उपस्थित होते. वृत्तसंकलनाचे कर्तव्य बजावत असताना पोलीस कर्मचारी चंद्रकांत कृष्णा शिंदे यांनी त्यांच्याशी अरेरावी केली आणि दमदाटीच्या स्वरात बोलत 'तुला पाहून घेईल' अशी धमकी दिल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. पत्रकाराने आपले कर्तव्य बजावत असताना पोलीस कर्मचाऱ्याकडून अशाप्रकारे दबाव आणण्याचा प्रयत्न झाल्याने पत्रकारांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून सार्वजनिक कार्यक्रमांचे वृत्तसंकलन करणे हे त्यांचे कर्तव्य आहे. कर्तव्य बजावणाऱ्या पत्रकाराशी पोलीस कर्मचाऱ्याने अरेरावी करणे, दमदाटी करणे किंवा धमकी देणे हा प्रकार कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतला जाणार नाही, अशी भूमिका मलकापूर पत्रकार संघटनेने घेतली आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत निष्पक्ष चौकशी करून संबंधित पोलीस कर्मचारी चंद्रकांत कृष्णा शिंदे यांच्यावर त्यांच्या गैरवर्तनाच्या स्वरूपानुसार नियमानुसार व कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन संबंधित पोलीस कर्मचाऱ्यावर कारवाई न झाल्यास पत्रकार संघटनेच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. या निवेदनावर पत्रकार अजय टप, कैलास काळे, करण झणके, शेख निसार, इलाही बक्ष, विजयकुमार वर्मा, मनोज पाटील, नागेश सुरंगे, नारायण पानसरे, शेख जमील, असित इंगळे, भिवा चोपडे, सतीश दांडगे, उमेश हिरुळकर, श्रीकृष्ण भगत, अनिल गोठी आदी पत्रकारांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

आता उपविभागीय पोलीस अधिकारी या गंभीर प्रकरणाची कितपत दखल घेतात आणि संबंधित पोलीस कर्मचाऱ्यावर कोणती कारवाई करतात, याकडे मलकापूरच्या पत्रकारांचे लक्ष लागले आहे. पत्रकारांवर दबाव आणणाऱ्या प्रवृत्तीला वेळीच आळा घाला!



# अहिल्यादेवींनी दिलेले संदेश सुखी जीवनाचा ठेवा!

## संदेश यात्रेच्या समारोप प्रसंगी माजी प्रदेशाध्यक्ष श्रीराम पुंडे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**चिखली :** पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी समाजाला दिलेले संदेश हे सुखी, समृद्ध आणि संस्कारित जीवनाचा ठेवा असून, त्यांच्या विचारांचा अंगिकार आजच्या समाजाने करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन धनगर समाज महासंघाचे माजी प्रदेशाध्यक्ष श्रीराम पुंडे यांनी केले.

चिखली येथे १० ऑगस्ट रोजी मौनीबाबा संस्थान येथे आयोजित अहिल्या संदेश यात्रेच्या समारोप कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा गौरव करताना पुंडे म्हणाले की, अहिल्यादेवींनी समाजाला जीवन जगण्याची दिशा देणारे पाच महत्त्वपूर्ण संदेश दिले.

देश आणि धर्माचे रक्षण करा, गंगाजलाप्रमाणे निर्मळ जीवन जगा, रंजल्या-गांजल्यांची सेवा करा, शिका-संघटित व्हा-स्वाभिमानी बना आणि प्रसंगी संघर्ष करा, तसेच समाधानी राहा, हे त्यांचे विचार आजच्या काळातही अत्यंत महत्त्वाचे आहेत. 'वाहिली ती गंगा, राहिले ते तीर्थ' या विचारातून त्यांनी जीवनातील समाधान, सेवाभाव आणि सत्कर्माचे महत्त्व सांगितले.

उमहेश्वर येथे अहिल्यादेवींनी उद्योगधंद्यांना प्रोत्साहन दिले. आजही महेश्वरी साडी जगभर प्रसिद्ध आहे. देशभरातील अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार, रस्ते, घाट, धर्मशाळा तसेच विविध सार्वजनिक सुविधा उभारण्याचे कार्य त्यांनी केले.

अहिल्यादेवी होळकर यांच्या कर्तृत्वाची जगातील अन्य कर्तृत्ववान महिला राज्यकर्त्यांशी तुलना केली जाते. अमेरिकेतील लेखक जॉन की यांनी आपल्या पुस्तकात इंग्लंडची राणी एलिझाबेथ प्रथम, रशियाची राणी कॅथरीन आणि डेन्मार्कची राणी मागरिट द्वितीय यांच्या कार्याचा उल्लेख करताना अहिल्यादेवींच्या कर्तृत्वाचे मोठेपण अधोरेखित केल्याचे पुंडे यांनी नमूद केले.

कार्यक्रमाला धनगर आरक्षण योद्धे दीपक बोराडे, अहिल्या महिला संघाच्या प्रदेशाध्यक्ष डॉ. अलका गोडे, जिल्हा सहकारी बँकेचे संचालक अंकुश पडघान, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख ऋषी जाधव, नगरसेवक कुणाल गायकवाड, उपनगराध्यक्ष कपिल खेडेकर, शंतनु बोंद्रे, मनोहर पाचपोर, शत्रुघ्न पाचपोर, प्रदीप हाके, पंडितराव साठे, मोतीराम लवंगे, प्रवीण सरदड, अरुण मखमले, भगवान खरात, प्रशांत भटकर, दीपक हाके, संपतराव मिसाळ, विजय शेळके, माणिकराव खरात यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यशस्वीतेसाठी धनगर समाज महासंघाचे जिल्हाध्यक्ष कडूबा गवारे, मल्हार सेनेचे जिल्हाप्रमुख सुनील मतकर, संजय काळे, विलास खरात, शिवानंद वीर, मार्तंड पंडित, सुभाष वीर आणि अभिषेक वीर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभम सोरमारे यांनी केले, तर आभार प्रदर्शन मार्तंड पंडित यांनी केले.

# स्वातंत्र्य दिनाचा मुख्य शासकीय ध्वजारोहण उपविभागीय अधिकारी डॉ रामेश्वर पुरी यांच्या हस्ते उत्साहात संपन्न

प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**खामगाव:** सर्वसामान्यांच्या हितासाठी शासन अनेक महत्त्वपूर्ण योजना राबवित आहे. याचा लाभ सर्वसामान्य नागरिकापर्यंत पोहोचविण्यासाठी शासन कटिबद्ध असून नवभारताचे स्वप्न साकारण्यासाठी भारतमातेची एकजुटीने सेवा करुयात, असे प्रतिपादन उपविभागीय अधिकारी डॉ. रामेश्वर पुरी यांनी यावेळी केले.

भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त आज भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर नगरपरिषद मैदान खामगाव येथे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले.



यावेळी नगराध्यक्ष न. प. खामगाव अर्पणाताई सागर फुंडकर माजी आमदार नानाभाऊ कोकरे, माजी आमदार दिलीप कुमार सानंदा, माजी नगराध्यक्ष अलकादेवी, सानंदा माजी नगराध्यक्ष सरस्वती ताई खासने, पंचायत समिती सभापती, माजी सभापती, तहसिलदार सुनिल पाटील, मुख्याधिकारी नगरपरिषद डॉ. प्रशांत शेळके, शिक्षणाधिकारी ,मुख्याध्यापक, शिक्षक ,नगरसेवक, पोलीस निरीक्षक, नायब तहसिलदार विजय पाटील, नायब तहसिलदार शिरीष वसावे, नायब तहसिलदार अभिजीत जोशी, नायब तहसिलदार निखिल पाटील, नायब तहसिलदार सोनाली भाजीभाकरे, उपविभागीय कृषी अधिकारी बी.जी. व्यवहारे ,पुरवठा निरीक्षक अधिकारी रोशनी फुलझेले, मंडलाधिकारी संतोष काळबागे अनिल खिराडे जीवन बटवे नगरसेवक स्वातंत्र्य सैनिक सर्व पत्रकार बंधू यांच्यासह विभागप्रमुख, अधिकारी -कर्मचारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

# रायसिंग सोलंके यांच्या कुटुंबाला मुख्यमंत्री सहायता निधीतून मदतीसाठी प्रस्ताव पाठविण्याच्या पालकमंत्र्यांच्या सूचना

प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**मलकापुर :** मौजे काटी, ता. नांदुरा येथील शेतकरी रायसिंग सिताराम सोलंके यांचा दरोडेखोरांशी झुंज देताना दुर्दैवी मृत्यू झाला. गावातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी दरोडेखोरांचा प्रतिकार करताना त्यांनी प्राण गमावल्याने त्यांच्या कुटुंबावर मोठे संकट कोसळले आहे.

या घटनेची सविस्तर माहिती देत रायसिंग सोलंके यांच्या कुटुंबाला १० लाख रुपयांची आर्थिक मदत मुख्यमंत्री सहायता निधीतून देण्यात यावी, अशी मागणी ॲड. साहेबराव मोरे, अध्यक्ष, किसान ब्रिगेड यांनी केली.



निवेदनाची दखल घेत पालकमंत्री मकरंद आबा पाटील यांनी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत मिळण्यासाठी आवश्यक प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना दिल्या.

या मागणीसाठी प्रसाद जाधव — जिल्हा कार्याध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी; अरुण अग्रवाल — जिल्हा उपाध्यक्ष; बाळू पाटील — जिल्हा उपाध्यक्ष; तसेच राजू डोफे — शहराध्यक्ष यांनी पाठपुरावा केला.

रायसिंग सोलंके यांच्या धाडसाचा सन्मान व्हावा आणि त्यांच्या पश्चात असलेल्या कुटुंबाला आर्थिक आधार मिळावा, यासाठी शासनाने तातडीने मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# भरधाव ट्रकच्या धडकेत गंभीर जखमी वृद्धाचा मृत्यू

## मलकापूर शहरातील रेल्वे स्टेशन परिसरातील घटना

प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**मलकापूर :** रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर चुकीच्या दिशेने भरधाव आलेल्या ट्रकने धडक दिल्याने गंभीर जखमी झालेल्या वृद्धाचा उपचारादरम्यान शुक्रवारी (दि. १४) पहाटे अकोला येथे मृत्यू झाला. रमेश किसन रायपूरे (७२, रा. धोंगर्डी, ता. मलकापूर) असे मृताचे नाव आहे. गुरुवारी (दि. १३) सकाळी तहसील चौकात हा अपघात झाला होता. वाहतूक कोंडीमुळे ट्रकने चुकीच्या दिशेने प्रवेश केल्याने हा अपघात घडल्याचा आरोप होत असून, रायपूरे हे वाहतूक व्यवस्थेच्या बळी ठरल्याची चर्चा आहे

रायपूरे हे गुरुवारी सकाळी वृत्तपत्र खरेदी करण्यासाठी स्टेशन रस्त्यावरील स्टॉलकडे जात होते. सकाळी ८:१५ वाजता एमएच २८ बीबी ६६३४ क्रमांकाचा ट्रक तहसील चौकातून स्टेशन रस्त्याकडे चुकीच्या दिशेने भरधाव आला. त्यावेळी ट्रकची रायपूरे यांना धडक बसली. ते ट्रकच्या चाकाखाली आल्याने गंभीर जखमी झाले. अपघातानंतर नागरिकांनी आरडाओरड केल्याने चालकाने ट्रक मागे घेतला.

घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी रायपूरे यांना तातडीने उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी अकोला येथे हलविण्यात आले; मात्र उपचार सुरू असताना शुक्रवारी पहाटे त्यांचा मत्य झाला

# शेतकऱ्याची आत्महत्या

प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**रोहिणखेडः** येथील एका ५८ वर्षीय शेतकऱ्याने चिंचेच्या झाडाला गळफास घेवून आत्महत्या केली. सदर घटना १२ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७.३० वाजेच्या सुमारास उघडकीस आली. मृतकाचे नाव सुरेश राजस असे आहे.

सुरेश ऊर्फ बाळू राजाराम राजस (वय ५८) यांची रोहिणखेड शिवारात गट न. ३०० मध्ये शेती आहे. शेतात जाण्यासाठी सुरेश राजस हे बुधवार १२ ऑगस्ट रोजी सकाळी साडेसात वाजेच्या घरून निघून गेले. सायंकाळी उशीरापर्यंत परतन आल्याने नातेवाईकांनी त्यांचा परिसरात शोध घेतला असता ते त्यांच्या शेतात सायंकाळी ७.३० वाजेच्या सुमारास चिंचेच्या झाडाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आले.

मृत्यूचे कारण मात्र समजू शकले नाही. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सून, नातवंडे व वृध्द आई-वडील असा आप्त परिवार आहे. सुरेद्र राजस यांच्या फिर्यादीवरून धा. बढे पोलिसांनी आकस्मीक मृत्यूची नोंद केली आहे. पुढील पोलिस करीत आहे.

# विशेष पोलीस महानिरीक्षकांचे हस्ते ठाणेदार व पोलिसांचा सन्मान

प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**जानेफळः** मंदिरातील दानपेटी फोडून रक्कम व सोन्याचे ऐवज लंपास केल्या प्रकरणाचा तपास अवघ्या ४८ तासाच्या आत लावून आरोपीस अटक करीत मुद्देमाल हस्तगत केल्याबद्दल जानेफळ पोलीस स्टेशनचे ठाणेदार शरद माळी व कर्मचाऱ्यांना विशेष पोलीस महानिरीक्षक परिक्षेत्र अमरावती डॉ. महेश पाटील यांच्याहस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

जानेफळ पोलीस स्टेशन हद्दीतील मोळी येथील नागेश्वर महादेव मंदिरातील दानपेटी ९ ऑगस्ट रोजी अज्ञात चोरट्यांनी फोडून त्यातील रक्कम व दागिने लंपास केल्याची घटना घडल्याने मंदिर संस्थानचे अध्यक्ष संदीप महादेव नागरिक यांच्या तक्रारीवरून जानेफळ पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात येऊन तपास सुरू करण्यात आला. त्यानंतर सावत्रा तालुका मेहकर येथील आरोपी नामे भीमराव माधव गवई याच्याबाबत पोलिसांना महत्त्वपूर्ण माहिती प्राप्त झाल्याने आरोपीस निष्पन्न करून ताब्यात घेण्यात आले होते. तपासादरम्यान सदर आरोपीकडून गुन्ह्याबाबत माहिती प्राप्त होऊन त्याने दानपेटी फोडून चोरी केल्याची कबुली दिली होती. त्यानंतर आरोपीकडून दानपेटीतून चोरी केलेली रोख रक्कम १८,९८४ रुपये, रु. ५००, रु.५०, रु. २० व रु. १० रुपयांच्या नोटा रु. १, रु.२ व रु.५ रुपयांची नाणी, आरोपीने वापरलेले २ मोबाईल फोन किंमत रु.२५ हजार, दानपेटीत दान केलेले १ ग्रॅम वजनाचे सोन्याचे नाग किंमत रु. १५ हजार, १ ग्रॅम वजनाचे चांदीचे नाग, गुन्ह्यात वापरलेली मोटार सायकल किंमत रु. ४२ हजार, दानपेटी फोडण्यासाठी वापरलेले लोखंडी २ गज अशाप्रकारे आरोपीकडून एकूण १ लाख ९८४ रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला होता.

# पिंक ई-रिक्षा'चे अनुदान दुप्पट; जिल्ह्यात लाभ नाही!

## आता ४० टक्के अनुदान; 'अ' वर्ग महानगरपालिका क्षेत्रापुरतीच योजना!

प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**खामगाव रू** महिला व मुलींना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासनाने 'पिंक ई-रिक्षा' योजना सुरू केली आहे. ई-रिक्षा खरेदीसाठी शासनाच्या वतीने देण्यात येणारे अनुदान २० टक्क्यांवरून ४० टक्के केले आहे. मात्र, ही योजना केवळ 'अ' वर्ग महानगरपालिका क्षेत्रापुरती मर्यादित असल्याने बुलढाणा जिल्ह्यातील पात्र महिलांना या योजनेचा लाभ मिळणार नसल्याची माहिती समोर आली आहे. अनुदानात दुप्पट वाढ झाल्याने राज्यातील पात्र महिलांना ई-रिक्षा खरेदी करून स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी मोठा आधार मिळणार आहे; मात्र योजनेची व्याप्ती केवळ 'अ' वर्ग महानगरपालिका क्षेत्रापुरती असल्याने जिल्ह्यातील महिलांना त्याचा थेट लाभघेता येत नाही. त्यामुळे योजनेचा विस्तार जिल्हास्तरावर करावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



### पात्रता आणि अटी-शर्ती काय ?

» महिला महाराष्ट्राची रहिवासी असणे आवश्यक आहे. अर्जदार महिलेचे वय २० ते ४५ वर्षे असावे. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न निर्धारित मर्यादित असणे तसेच महिलेचा वैध वाहनचालक परवाना असणे आवश्यक आहे. योजनेची अंमलबजावणी केवळ 'अ' वर्ग महानगरपालिका क्षेत्रापुरती मर्यादित असल्याने बुलढाणा जिल्ह्यातील महिलांना त्याचा लाभमिळत नाही.

### ५० टक्के कर्ज, १० टक्के लाभार्थी हिस्सा

» योजनेअंतर्गत ई-रिक्षा खरेदीसाठी ४० टक्के शासकीय अनुदान, ५० टक्के बँक कर्ज आणि १० टक्के लाभार्थीचा हिस्स अशी आर्थिक रचना आहे. त्यामुळे ई-रिक्षा खरेदीसाठी लागणाऱ्या एकूण रकमेत लाभार्थी महिलेचा स्वतःचा आर्थिक भार तुलनेने कमी राहणार आहे यामुळे महिलांना कमी भांडवली गुंतवणुकीत व्यवसाय सुरू करून स्वावलंबी होण्याची संधी मिळणार आहे.

### काय आहे 'पिंक ई-रिक्षा' योजना ?

» महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे आणि शहरांमध्ये महिलांसाठी सुरक्षित वाहतुकीचा पर्याय उपलब्ध करून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. योजनेअंतर्गत पात्र महिलांना ई-रिक्षा खरेदीसाठी शासकीय अनुदान तसेच बँकेमार्फत कर्ज उपलब्ध करून दिले जाते.

# बडनेरा-नाशिक रोड मेमू आता नियमित; शेगावसह 16 रेल्वे स्थानकांना मोठा फायदा

प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**शेगाव :** बडनेरा ते नाशिक रोड दरम्यान धावणाऱ्या मेमू विशेष रेल्वे सेवेचे आता नियमित रेल्वे सेवेत रूपांतर करण्यात आले आहे. रेल्वे प्रशासनाच्या या निर्णयामुळे शेगावसह मार्गावरील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार असून, १५ ऑगस्ट २०२६ पासून ही सेवा नवीन गाडी क्रमांकासह दररोज धावणार आहे.

सध्या गाडी क्रमांक ०१२११/०१२१२ म्हणून धावणाऱ्या बडनेरा-नाशिक रोड मेमू विशेष सेवेचे रूपांतर गाडी क्रमांक ६११३० बडनेरा-नाशिक रोड मेमू आणि ६११२९ नाशिक रोड-बडनेरा मेमू अशा नियमित सेवेत करण्यात आले आहे. गाडी क्रमांक ६११३० बडनेरा-नाशिक रोड मेमू दररोज सकाळी १० वाजून ५ मिनिटांनी बडनेरा येथून सुटेल आणि त्याच दिवशी सायंकाळी ७ वाजून ४० मिनिटांनी नाशिक रोडला पोहोचेल. परतीची गाडी क्रमांक ६११२९ नाशिक रोड-बडनेरा मेमू रात्री ९ वाजून १५ मिनिटांनी नाशिक रोडहून सुटेल आणि दुसऱ्या दिवशी पहाटे ५ वाजून ३५ मिनिटांनी बडनेरा येथे पोहोचेल.

या रेल्वेला मूर्तिजापूर, बोरगाव, अकोला, शेगाव, नांदुरा, मलकापूर, बोदवड, भुसावळ, जळगाव, पाचोरा, कजगाव, चाळीसगाव, नांदगाव, मनमाड, लासलगाव आणि निफाड या रेल्वे स्थानकांवर थांबे देण्यात आले आहेत. त्यामुळे या मार्गावरील विद्यार्थी, नोकरदार, व्यापारी तसेच दैनंदिन प्रवास करणाऱ्या नागरिकांना नियमित रेल्वे सेवेचा लाभ मिळणार आहे.

# वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पासह पाणीपुरवठा योजनांचा पालकमंत्री यांनी घेतला आढावा

प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**बुलढाणा :** वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पासह जिल्ह्यातील विविध पाणीपुरवठा व सिंचन प्रकल्पांचा मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी आढावा घेतला. जिल्ह्यातील नागरिक व शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित योजनांची कामे गतीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित विविध आढावा बैठकीत आ. संजय गायकवाड, आ. श्वेताताई महाले, आ. मनोज कायंदे, जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे, निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे, उपविभागीय अधिकारी, मुख्याधिकारी, तसेच विविध विभागांचे विभागप्रमुख उपस्थित होते. बुलढाणा व मोताळा तालुक्यातील विविध पाणीपुरवठा योजनांची सद्यस्थिती, उपलब्ध पाणीसाठा, भविष्यातील पाण्याची गरज तसेच योजनांच्या अंमलबजावणीबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. ग्रामीण भागातील नागरिकांना पुरेसे व नियमित पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी संबंधित योजनांची कामे वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश पालकमंत्री ना. पाटील यांनी दिले. वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पातून बुलढाणा मतदारसंघातील वंचित राहणाऱ्या भागांना सिंचन, पिण्यासाठी तसेच औद्योगिक वापरासाठी वाढीव पाणी भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन योजनांना गती देण्याचे निर्देश उपलब्ध करून देण्याच्या शक्यता तपासाव्यात, अशा सूचना पालकमंत्र्यांनी दिल्या.

# दर्यापूर नंतर अकोल्यात काँग्रेसला बसणार धक्का !

## पंजा सोडून डॉक्टर अभय पाटील धनुष्यबाण घेणार का हाती?

प्रतिनिधी १६ ऑगस्ट

अकोला: सध्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत इनकमिंग जोरात सुरू आहे. अवघ्या दोन दिवसांपूर्वी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने दर्यापुरातील काँग्रेसचे 19 नगरसेवक फोडले. दर्यापूर नंतर आता पुन्हा एकदा काँग्रेसला धक्का बसण्याची शक्यता आहे

दर्यापूर सर केल्यावर आता अकोल्यात काँग्रेसकडून लोकसभा निवडणूक लढवलेल्या अभय पाटलांसोबत एकनाथ शिंदे यांचा खास माणूस एड. निलेश देशमुख यांनी भेट घेतली. डॉ. अभय पाटील यांच्या टॉवर चौकातील निवासस्थानीच ही भेट





पार पडल्याची माहिती मिळतेय. काँग्रेसच्या कार्यपद्धतीमुळे नाराज होऊन काँग्रेस सोडणारे डॉ. अभय पाटील मोठा राजकीय निर्णय घेणार असल्याची जोरदार चर्चा आहे. काही दिवसांपूर्वी डॉ. अभय पाटील यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. त्यानंतर डॉ. अभय पाटील हे समर्थकांसह बैठक घेऊन मोठा राजकीय निर्णय घेण्याच्या तयारीत असल्याचे बोलले जात आहे. परंतु या बैठकीआधी त्यांनी एडवोकेट निलेश देशमुखांची भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. दोन्ही नेत्यांमध्ये तब्बल दोन तास बैठक झाली. त्यांनी एकत्र जेवण देखील केलं. त्यामुळे या डिनर डिप्लोमॅसीची शहरात जोरदार चर्चा रंगली आहे. दोन्ही नेत्याची बैठक झाल्याने शिंदे गटाला मोठा राजकीय मासा गळाला लागल्याचे बोलले जात आहे. डॉ. अभय पाटील यांनी काही दिवसांपूर्वी एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. दोघांमध्ये झालेल्या बैठकीत राजकीय विषयावर चर्चा झाल्याचं बोललं जात आहे. त्यामुळे डॉ. अभय पाटील हे लवकरच शिंदे गटात प्रवेश करणार असल्याची जोरदार चर्चा रंगली आहे. मागील लोकसभा निवडणुकीत थोड्या मताने हरलेल्या डॉक्टर अभय पाटलांनी काँग्रेसच्या कार्यपद्धतीला कंटाळून पक्षाची साथ सोडली. त्यानंतर त्यांनी कोणत्याही पक्षात प्रवेश केला नव्हता. त्यानंतर आता डॉ. अभय पाटील हे पुढील दोन दिवसांत मोठा निर्णय घेण्याची शक्यता आहे. त्यांचा शिवसेनेत प्रवेश झाल्यास काँग्रेसला मोठा धक्का बसण्याची शक्यता असून शिंदे सेनेला एक आश्वासक चेहरा जिल्ह्यात मिळाल्यास जिल्ह्यात पक्ष वाढीसाठी मोठी मदत होईल.

# महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघातर्फे पत्रकारांचा सन्मान सोहळा

## 'अकोला कॉटन सिटी' वृत्तपत्राचे विमोचन

प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**अकोला:** ग्रामीण आणि शहरी भागात पत्रकारितेच्या माध्यमातून जनतेचे प्रश्न प्रभावीपणे मांडणाऱ्या तसेच सचोटीने पत्रकारिता करणाऱ्या पत्रकारांचा गौरव करण्यासाठी महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघाच्या वतीने १५ ऑगस्ट रोजी हॉटेल सेंट्रल प्लाझा, अकोला येथे भव्य पुरस्कार वितरण व सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. अकोला जिल्ह्यातील पत्रकार तसेच महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघाचे पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकजागर मंचचे संस्थापक तथा भाजप नेते अनिल गावंडे होते. प्रभात किड्सचे संचालक डॉ. गजानन नारे, पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुधाकर खुमकर आणि विभागीय अध्यक्ष विठ्ठल महल्ले यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन ॲड. सुधाकर खुमकर यांनी केले. उपस्थित मान्यवरांचा संघाच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी पत्रकारितेचे समाजातील महत्त्व अधोरेखित करत पत्रकारांच्या कार्याचे कौतुक केले. पुरस्कारप्राप्त पत्रकारांना त्यांच्या पुढील पत्रकारितेच्या वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या सोहळ्यात संजय खांडेकर, योगेश



फरपट, विलास देशमुख, शंतनू राऊत, श्रीकांत राऊत, रवि देशमुख, शिवाजी भोसले, सुनिल कोरडीया, विकल्प ठाकूर, रिझवान खान, योगेश विभुते, अनुराग अभंग, मुकुंद कोरडे, सदानंद खारोडे, अनवर खान हनीफ खान, शेषराव शिरसाट, प्रचारक ओलवे, सुभाष अग्रवाल आणि गजानन येनकर यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. ग्रामीण भागातील पत्रकारांपासून शहरातील पत्रकारांपर्यंत सर्वांना एकत्र आणून त्यांच्या कार्याचा गौरव करण्याच्या संघाच्या भूमिकेचे उपस्थितांनी स्वागत केले. जिल्ह्यातील पत्रकारांना एकत्र आणणारा आणि त्यांच्या कार्याला प्रोत्साहन देणारा हा उपक्रम भविष्यातही अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. या कार्यक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे 'अकोला कॉटन सिटी' या नव्या वृत्तपत्राचे मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आलेले विमोचन. मुख्य संपादक जावेद जकरिया यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या 'अकोला कॉटन सिटी' वृत्तपत्राची ओळख 'आपका शहर... आपकी बात... सच्ची आवाज' या भूमिकेतून करण्यात आली आहे. अकोला शहर व जिल्ह्यातील जनतेचे प्रश्न, स्थानिक घडामोडी, सामाजिक उपक्रम, विकासकामे आणि जनहिताचे विषय प्रभावीपणे मांडण्याचा या वृत्तपत्राचा प्रयत्न राहणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हाध्यक्ष अनिल माहोरे, कार्याध्यक्ष नीरज आवंडेकर, जिल्हा सरचिटणीस जावेद जकरिया आणि अकोला तालुका अध्यक्ष प्रमोद मुरुमकार यांच्यासह संघाच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. शेवटी जावेद जकरिया यांनी उपस्थित मान्यवर, पत्रकार संघाचे पदाधिकारी व सदस्य यांचे आभार मानले.

# भाजपचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांचा पाकिस्तानवर निशाणा

प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**अमरावती :** पाकिस्तान तेरे तुकडे होंगे... इन्शाअल्लाह, इन्शाअल्लाह! आणि जय श्रीराम, जय श्रीराम!" भाजपचे राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी पाकिस्तानवर निशाणा साधत थेट इशारा दिला आहे ! जेव्हा दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठात (JNU) 'भारत तेरे तुकडे होंगे'च्या घोषणा दिल्या जात होत्या, त्याला जोरदार प्रत्युत्तर देत खा. बोंडे यांनी आता पाकिस्तानचे पाच तुकडे होणार असा मोठा दावा केला आहे. खा. बोंडे म्हणाले की, निरपराध महिलांवर केलेले अत्याचार आणि गोहत्येचा शाप आता पाकिस्तानला भोगावे लागत आहे. याच पापामुळे भूतकाळात पाकिस्तानचे दोन



तुकडे होऊन बांगलादेशची निर्मिती झाली, तर बलोचिस्तानने आधीच स्वतःला स्वतंत्र घोषित केले आहे. पुढे बोलताना बोंडे म्हणाले की, आता पाकिस्तानच्या नाशाची वेळ जवळ आली असून त्याचे पाच भाग होणार आहेत— बलुचिस्तान, पख्तुनिस्तान, सिंध, काश्मीर आणि पंजाब! अमरावतीत खा. बोंडे यांच्या या वक्तव्यामुळे आणि दिलेल्या घोषणांमुळे राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे..

# माहेश्वरी भवनात नगरसेवक सुनील इन्नानी यांच्या हस्ते ध्वजारोहण

## माहेश्वरी समाज ट्रस्टच्या वतीने स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी १६ ऑगस्ट

अकोला : माहेश्वरी समाज ट्रस्टच्या वतीने लरातो माहेश्वरी भवनात १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिन सोहळा साजरा करण्यात आला. नगरसेवक सुनील इन्नानी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. माहेश्वरी समाज ट्रस्टचे अध्यक्ष विजयकुमार तोष्णीवाल, किरण मुंदडा नागपूर, रमण हेडा आणि मान्यवरांची उपस्थिती होती.माहेश्वरी समाज ट्रस्टच्या वतीने माहेश्वरी भवनात स्वातंत्र्य दिन अत्यंत उत्साहाने साजरा झाला. नगरसेवक सुनील इन्नानी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. माहेश्वरी समाज ट्रस्टचे अध्यक्ष आणि मान्यवरांची उपस्थिती होती. या प्रसंगी बोलताना नगरसेवक सुनील इन्नानी यांनी समाजाने पारंपरिक व्यवसायाकडे वळावे असे आवाहन केले. काळाची पावले ओळखून वाटचाल करणे हिताचे ठरेल असे ते म्हणाले. इन्नानी यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. अतिशय सुंदर असा कार्यक्रम झाला.



# नगरसेवक गिरीश गोखले यांच्या पुढाकाराने एसटी स्मार्ट कार्ड शिबिर

## जठारपेठ चौक आणि न्यू तापडिया नगरात तीन दिवसीय शिबिर

प्रतिनिधी १६ ऑगस्ट

अकोला: स्वातंत्र्य दिनानिमित्त नगरसेवक ॲड. गिरीश गोखले यांच्या पुढाकाराने १५ ते १७ ऑगस्ट दरम्यान जठारपेठ चौक आणि न्यू तापडिया नगरात एसटी स्मार्ट कार्ड शिबिर आयोजित करण्यात आले आहे. शनिवारी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून महिला भगिनी आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी एसटी स्मार्ट कार्ड शिबिर आयोजित करण्यात आले



आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या युती सरकारने लाडकी बहीण योजना सुरू केली. अशा लोकोपयोगी योजनांचा लाभ समाजाला मिळावा म्हणून शिबिर आयोजिले आहे. तीन दिवसांच्या शिबिराचा महिला तसेच ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा असे आवाहन देखील ॲड. गिरीश गोखले यांनी केले. गिरीश गोखले मित्र परिवाराचे भक्कम सहकार्य शिबिराला मिळत आहे.

# केंद्रीय विद्यालय अकोल्याच्या शिक्षण क्षेत्रात मोठी उपलब्धी : ॲड. आकाश फुंडकर

## प्रवेशोत्सव उत्साहाने साजरा

प्रतिनिधी १६ ऑगस्ट

अकोला : केंद्रीय विद्यालयासारखी महत्वपूर्ण शैक्षणिक संस्था अकोल्यात सुरू झाली आहे. अकोल्याच्या शिक्षण क्षेत्रात ही मोठी उपलब्धी आहे. त्यामुळे येथील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी व उज्वल भविष्याची हमी मिळाली आहे, असे प्रतिपादन राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी केले. स्वातंत्र्यदिनी केंद्रीय विद्यालयाचा प्रवेशोत्सव पालकमंत्र्यांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते. खासदार अनुप धोत्रे, जिल्हाधिकारी



वर्षा मीना, पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, केंद्रीय विद्यालय समितीचे सदस्य, सार्वजनिक बांधकाम विभाग व इतर यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते. ॲड. फुंडकर म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशात आयआयटी, केंद्रीय विद्यालयासारख्या महत्वपूर्ण शैक्षणिक संस्थांचा विस्तार होत आहे. अकोल्यात केंद्रीय विद्यालय असावे, असे माजी केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री संजय धोत्रे यांचे स्वप्न आज पूर्ण होत आहे. खासदार धोत्रे म्हणाले, अकोल्यात केंद्रीय विद्यालय सुरू होणे अत्यंत आनंदाची बाब आहे. यापुढे ४५ कोटी रु. निधीतून केंद्रीय विद्यालयाची नवीन इमारत, सुविधापूर्ण परिसर निर्माण होणार आहे. केंद्रीय विद्यालयासाठी जागा निश्चिती, लवकरात लवकर सत्र सुरू करता येणे यासाठी सर्वांच्या प्रयत्नांना यश मिळाले व आज प्रवेशोत्सव होत आहे. नोकरीनिमित्त बदल्या होणाऱ्या पालकांच्या पाल्यांना निरंतर शिक्षणासाठी ही चांगली सुविधा आहे, असे जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना पालकमंत्र्यांच्या हस्ते खाऊवाटप झाले. विद्यार्थ्यांनी भारत स्वर्णीम गौरव गीत सादर केले. पालकमंत्र्यांच्या हस्ते विद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपणही करण्यात आले. केंद्रीय विद्यालय मुंबई कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त रमेश पाटील यांनी प्रास्ताविक केले.

# माँ गायत्री प्राथमिक मराठी शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहाने साजरा

## संस्थेच्या पदाधिकारी आणि लिनेस क्लब अध्यक्षांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले

प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**अकोला:** मां गायत्री प्राथमिक मराठी शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालयात ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त शनिवारी सकाळी संस्थेच्या उपाध्यक्ष तथा लिनेस क्लब प्रांत अध्यक्ष कल्पनाताई प्रदीप देशमुख आणि लिनेस क्लब अध्यक्ष राजश्री समनपुरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. अतिशय उत्साहपूर्ण वातावरण होते. प्रमुख अतिथी म्हणून लिनेस क्लबच्या डॉ. तारा माहेश्वरी, आशा विरवानी, सुमेधा गुप्ता, उषाजी बाहेती, आरती खंडेलवाल,



आशा मोटवानी, अलका उमाळे, संस्थेचे माजी झध्यक्ष श्री. सिध्देश्वर देशमुख उपस्थित होते. कल्पनाताई देशमुख यांनी स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व आपल्या भाषणात सांगितले. श्री. सिद्धेश्वर देशमुख यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या प्रगतीवर प्रकाश टाकला तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. लिनेस क्लबच्या राजश्री समनपुरे आणि आशा मोटवानी यांनी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून बक्षिसे वितरित केली. शाळेचे मुख्याध्यापक संदीप वाघ, सुनील चव्हाण, शिक्षक रामेश्वर बुंदेले, मिना काटे, चंदा रोकडे, वर्षा हिवराळे, कीर्ती पोटे, आरती देशमुख, पुजा बुंदेले, वैशाली इंगळे, कल्पना सोळंके शिक्षकेतर कर्मचारी चंद्रजित देशमुख, योगेश लंगोटे, रणजीत ठाकुर, शालीनी मोरे यांचा कार्यक्रमाच्या आयोजनात सहभाग होता.

# डवले पब्लिक स्कूल येथे स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

## मान्यवरांच्या उपस्थितीत राष्ट्रध्वजाला मानवंदना

प्रतिनिधी १६ ऑगस्ट

अकोला : श्री डवले कॉलेज तसेच डवले पब्लिक स्कूल, मोठी उमरी, अकोला येथे भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन अत्यंत उत्साहपूर्ण आणि देशभक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून डॉ. रवींद्र चौधरी तसेच ख्यातनाम डॉ. वनश्री डोईफोडे यांची विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या निमित्ताने संस्थेचे अध्यक्ष प्रकाश डवले सर, सचिव मृणालिनी डवले मॅडम, तसेच सौ. वैशाली निवाने आणि सौ. प्रज्ञा इचे यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले आणि राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, भाषणे व विविध



सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून स्वातंत्र्यदिनाचा उत्साह द्विगुणित केला. विद्यार्थ्यांसोबत शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मार्गदर्शन करताना डॉ. रवींद्र चौधरी यांनी विद्यार्थ्यांना व्यसनांपासून दूर राहण्याचा अनमोल संदेश दिला. च्व्यसनापासून दूर राहून आपल्या आयुष्याला योग्य दिशा द्या आणि आपल्या उज्वल भविष्याची जडणघडण करा,ज्ञ् असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. डॉ. वनश्री डोईफोडे यांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यदिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा देत, आजच्या डिजिटल युगात विद्यार्थ्यांनी मोबाईलचा अनावश्यक वापर टाळावा, मोबाईलपासून योग्य अंतर ठेवावे आणि आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन केले. शिक्षण, आरोग्य आणि सकारात्मक विचार यांना जीवनात महत्त्व देण्याचा संदेश दिला. संस्थेचे अध्यक्ष प्रकाश डवले सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, च्विद्यार्थ्यांचा विकास म्हणजे शाळेचा आणि महाविद्यालयाचा विकास; आणि शिक्षणातून घडणारा विद्यार्थीच पुढे देशाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावतो,ज्ञ् असे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षणावर लक्ष केंद्रित करून स्वतःचा, संस्थेचा आणि पर्यायाने देशाचा विकास घडविण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असा प्रेरणादायी संदेश त्यांनी दिला. कार्यक्रमास सौ. प्राची घिनमिने, सौ. कविता बलिंगे, सौ. श्वेता तायडे, कु. दीपाली चिकटे, सौ. स्वाती बोरोडे, वररुची खेडकर, सौ. श्रद्धा देशपांडे, सौ. इतका दुबे, सौ. रजनी पांडे, कु. पारिजात पुनसे, सागर लोखंडे, श्याम सुलताने, किशोर स्वर्गे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन सौ. श्रद्धा देशपांडे तसेच सौ. कविता बलिंगे यांनी केले. कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे आभार कु. दीपाली चिकटे यांनी मानले.

# श्री मारवाडी ब्राह्मण संस्कृत विद्यालयात देशभक्तीच्या वातावरणात साजरा झाला स्वातंत्र्य दिन

प्रतिनिधी १६ ऑगस्ट

**अकोला :** देशाच्या 80 व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त श्री मारवाडी ब्राह्मण संस्कृत विद्यालय, गणपत शर्मा भवन नीमवाडी येथे ध्वजारोहणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सौ. स्मिता राजेश अग्रवाल होत्या. प्रमुख अतिथी डॉ. दीपक बोहरा सीनियर हृदय रोग तज्ज्ञ, ओझोन यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. विजय शर्मा सीनियर दंत चिकित्सक उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, नृत्य आणि नाटक सादर करून उपस्थितांची मने जिंकली. शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मेधावी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करून बक्षीस वितरण करण्यात आले. प्राचार्य सौ. स्मिता अग्रवाल यांनी विद्यार्थ्यांना देशहितासाठी कार्य करण्याची शपथ दिली आणि शिस्त, शिक्षण व संस्कार जपण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन स्वाती अढागळे व लक्ष्मी चौधरी यांनी केले. कार्यक्रमाला राजेश गोकुलचंद शर्मा, गिरिराज तिवारी, राजेश सिवाल, देवकीनंदन



शर्मा, हरिप्रसाद शर्मा, ॲड. सतनारायण जोशी, अरुण शर्मा, कृष्ण गोकुलचंद शर्मा, ॲड. सुशील शर्मा, राजेश शर्मा, अमर गौड, उमंग जोशी, रवी जोशी, प्रकाश जोशी, पुरुषोत्तम शर्मा, हर्ष जोशी, नितीन जोशी, मास्टर. आरव शर्मा यांच्यासह मान्यवर व पालक उपस्थित होते. तसेच सौ. चित्रा इंगळे, सौ. सीमा राऊत, सौ. गायत्री ननावरे, सौ. मेघा देशपांडे, सौ. सारिका चौधरी, सौ. पूर्णिमा पांडे, सौ. रंजना म्हैसणे, सौ. आरती सुळे, सौ. पूजा गवई, सौ. सुनंदा कांबे, सौ. मंगला धायडे, सौ. वनिता भगत, सौ. वर्षा सोनकर, सौ. वैशाली बोबडे, श्री. गजानन भगत, श्री. राजेश सर, सौ. प्रीती तिवारी, श्री. आकाश तिवारी यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135